# अथातो धर्मजिज्ञासा

# अथर्ववेद

## हिंदू तत्त्वज्ञान आणि अध्यात्म



कुमारी शक्तिलीला (निकिता राजेश पाटील)

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# अथातो धर्म- जिज्ञासा-४

(हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म)

निकिता राजेश पाटील

**एका विद्यार्थिनीने** लिहीलेलं हे पुस्तक.

तुम्हाला विनामूल्य वाचायला देण्याचा एकच हेतू आहे, तो म्हणजे तुमचा अभिप्राय जाणून घेणं. या विचारांच्या जडणघडणीत सुजाण वाचकांच्या सूचनांचा आभारपुर्वक समावेश करणं.

वाट पहातो आहोत. फ़ोन, whatsapp, email साधे पत्र कोणत्याही पद्धतीने आपला अभिप्राय नक्की पोहोचवा.


निकिता राजेश पाटील

पत्ता: १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ,
वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503
फो. न.: ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com

# अथातो धर्म- जिज्ञासा- ४

## (हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म)

निकिता राजेश पाटील

पत्ता: १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ, वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503

फो. न.: ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com

**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.**

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts

प्रकाशक:ई साहित्य प्रतिष्ठान
www. esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
eternity,
eleventh floor,
eastern express highway,
Thane. 400604

प्रकाशन: १५ ऑक्टोबर २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# *अथातो धर्मजिज्ञासा भाग ४*

## *- अथर्ववेद*

## *(हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म)*

-निकिता राजेश पाटील

**परिचय:** नाव:-निकिता राजेश पाटील.



वांगणीत वास्तव्य.

"कुमारी शक्तिलीला" या नावाने कविता लेख कथांचे लेखन.

**वाड्मयीन परिचय-**

१. चंद्रिका अशा मासिकात श्लोक लेखन.

२. टिळक नगर सांस्कृतिक महोत्सवात 'द्रौपदीचे स्वगत' या एकपात्री प्रयोगाचे सादरीकरण. (वेशभूषा, प्रयोग लेखन, फार्सलेखन यांचा मेळ )

३. विद्याविकास संस्थेच्या वार्षिकात (सांवत्सरिकात) रौप्य महोत्सवानिमित्त 'द्रौपदीचे आत्मकथन हा ललित लेख, 'मनाचे प्रदुषण' ही कविता व 'बायको नावाचं अजीब रसायन' ही विनोदी कथा प्रकाशित.

४.  डोंबिवलीतील आणि बदलापुरात काव्य संमेलनात सक्रिय सहभाग.

६. अनेक निबंध, वकृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक.

७.  संस्कृत भाषेतील 'अमृत गौरव'  पुरस्कार,

८.  अस्मिता या हस्तलिखित सांवत्सरिकात नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर या लेखाचे लेखन,

९.  मानव विद्या विभागात वाचन संस्कृती'  डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाचे महत्त्व या विषयांवर संशोधन.

१०. 'फार फार वर्षांपूर्वी'  व 'संघर्ष'  ,' सीमान्त'  या तीन पुस्तकांवर केलेली समीक्षा. त्यातील संघर्ष'  या समीक्षाला पुरस्कार प्राप्त.

११. मनोजन'  या मासिकात मानसिक आरोग्याचा मूलमंत्र या विषयावर लेख. सृजन या वार्षिकात कविता आणि लेख प्रकाशित.

१२. चित्रकलेत गोल्ड मेडल.

१३. ई साहित्यावर एक रहस्य कथासंग्रह, दोन कादंबऱ्या (द्रौपदी वर आधारित), अद्भुत कथासंग्रह, विडंबन काव्य संग्रह, चार आध्यात्मिक ग्रंथ, एक विज्ञान लेखमाला, 'अधातो धर्म जिज्ञासा ' हिंदू तत्वज्ञान व

अध्यात्म’ या विषयावर आधारित दोन भाग प्रकाशित, अशी एकूण चौदा पुस्तके प्रकाशित झाली.

१५. अथातो धर्म जिज्ञासा’ या हिंदू तत्त्वज्ञान आणि अध्यात्म विषयावर प्रबंध.

१६. महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेच्या संकल्पना सादरीकरण स्पर्धेत द्वितीय क्रमांक.

वाचन:- मी आजपर्यंत विविध प्रकारची पुस्तके वाचली आहेत. त्यातील सगळ्यात जास्त महाभारताची पुस्तकं आहेत.

शिक्षण:- एसवाय बीए,

माझं हे प्रबंध रुपी पुस्तक आवडल्यास shaktileelanikita@gmail.com या ईमेलवर अभिप्राय देण्यासाठी संपर्क साधू शकता. माझी इतरही पुस्तके डाऊनलोड करून तुम्ही वाचण्याचा मनमुराद आनंद घेऊ शकता.

फोन नंबर:- ८६८९९५४८०६👸 👰 👸


# अर्पणपत्रिका


***माझ्या प्रेमळ, स्नेहलता, मनस्विनी, मेधावी, महाभारतातील सारमौक्तिकांचे ज्ञान प्रदान करणाऱ्या, अध्यात्म आणि गृहस्थाश्रम यांना एकाच गाडीची चक्रे बनवणाऱ्या, विश्वातील रहस्ये उलगडून देणाऱ्या, माझ्या मातेला व गुरुला हा संशोधन प्रबंध समर्पित.***

***तुझी पुत्री आणि शिष्या,***

***कुमारी शक्तिलीला..***

कुमारी शक्तिलीला लिखित अथातो धर्मजिज्ञासाचे पहिले तीन भाग (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद) आपण त्या त्या मुखपृष्ठावर क्लिक करून वाचू शकता.






# उपोद्घात



अथर्ववेद असा एकमेव वेद आहे, ज्याची निर्मिती उत्तर वैदिक काळात झाली आहे, ज्याचे एकही आरण्यक नसून एकच ब्राह्मण्य आहे, जो गद्य पद्य स्वरूपात आहे आणि इतका लोकप्रिय आहे की मुघल काळामध्ये अथर्व वेदाचे फारसी भाषांतर अब्दुल कादिर बदायुनी याने सुरू केले आणि इब्राहिम सरहिंदीने पूर्ण केले.

अथर्ववेद हा असा एकच वेद आहे की ज्याचे भाषांतर फारसी मध्ये झाले आहे.

असे अनेकदा आताही म्हटले जाते की अथर्ववेदामध्ये भूत- प्रेत, वशीकरण, जादूटोणा, तंत्र- मंत्र आदींचे विवेचन केले आहे.

मात्र हे असत्य आहे.

अथर्ववेदामध्ये अत्यंत रसाळ पद्धतीने विज्ञान, राजनीती, भूगोल, धर्मशास्त्र व अर्थशास्त्र सांगितलेले आहे.

लोकतंत्राचा उगमही अथर्ववेदाच्या श्लोकांना मानले जाते.

अथर्व वेदांमध्ये असे वर्णन आहे की युद्ध आधी मस्तिष्कामध्ये लढले जाते, नंतर ते भूमीवर लढले जाते.

यातूनच आपल्याला कळते की चाणक्याने चाणक्य नीति या वेदाच्या आधारावरच लिहिली असेल.

याखेरीज आपल्याला अथर्ववेदाच्या अनेक मंत्रांमध्ये विज्ञान प्राप्त होते.

ब्रह्मगवी आणि ब्राह्मण सूक्तांमध्ये समाजात ब्राह्मणांचे असलेले उच्च स्थान, त्यांचे कार्य, कर्तुत्व, योग्यता आणि गरिमा यांचे महत्व विशद केलेले आहे.

भुवनपति सूक्त, महद्ब्रम्ह सूक्त, विद्युत् सूक्त, नारीसुखप्रसूति सूक्ताचे मंत्र या मंत्रांमधून जीवनाचे विज्ञान झळकते.

याशिवाय ज्येष्ठ ब्रह्म सूक्तामध्ये सनातन धर्म, सनातन शक्ती, सनातन पुरुष आदींचे विवेचन देखील आहे.

म्हणून हे सर्व वाचणे अत्यंत आवश्यक आहे.

# अथातो धर्म- जिज्ञासा- ४

# अथर्ववेद

## हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म

*(संशोधनपर प्रबंध)*

# अथर्ववेद

अथर्ववेद हा उत्तर वैदिक काळामध्ये निर्माण झालेला आहे. ह्या वेदाला 'अथर्ववेद' म्हणतात, कारण या अथर्ववेदामध्ये अथर्व ऋषिंचे अधिक मंत्र आढळतात. याखेरीज यामध्ये अंगिरस ऋषिंचेही मंत्र या वेदामध्ये आढळतात. म्हणून या वेदाला 'अथर्वगिंरस' असेही म्हटले जाते. अथर्व म्हणजे अभिचार, अथर्ववेद म्हणजे अभिचारांचे ज्ञान. अथर्ववेदाचे २० अध्याय, २० कांड, तर ७३१ सूक्त असून ६००० पेक्षा अधिक मंत्र आहेत. अथर्ववेदाला ब्रम्हवेद म्हटले जाते. कारण अथर्ववेदातील ९६७ मंत्र ब्रम्हाद्वारे रचलेले आहेत. अथर्ववेदाला सतवेद, महिवेद, भृंगावरी वेद, भृगुवेद व क्षत्रवेद असेही म्हटले जाते. हा असा एकमेव वेद आहे, ज्याचा एकही आरण्यक नसून एकच ब्राम्हण्य आहे. अथर्ववेदाचे ज्ञान सर्वप्रथम परमेश्वराने महर्षी अंगिरांना दिले, तेच ज्ञान अंगीरांनी ब्रम्हापुढे व्यक्त केले. भूगोल, खगोल,

वनस्पती विद्या, जडीबुटी, पुनर्जन्माचा उल्लेख, लोकतंत्र, आयुर्वेदाचे महत्व, गंभीर रोगांचा उपचार व चिकित्सा, भूत-प्रेत, वशीकरण, आदिचे निवारण, कीटककृमींचा नाश, अर्थशास्त्रांचे सिद्धांत, शासकीय- राजकीय, राजनीतीचे गुह्य ज्ञान, राष्ट्रभाषा अथवा राष्ट्रभूमीची महिमा, कृमीपासून रोगांचे विवेचन, मृत्यू, व्याधी, भूकंप व आपत्ती दूर करण्याचे मंत्र, मोक्ष, प्रजजनाचे विज्ञान आदिचे निरूपण देखील आहे.

पिप्पलाद, पैपल, दान्त, प्रदान्त, स्नात, सौल, ब्रम्हदाबल, शौनक, देवदर्शत आणि चरणविद्या ह्या अथर्ववेदाच्या नवं शाखा आहेत.

वर्तमानामध्ये शौनक आणि पिप्पलाद या शाखा अधिकतर प्रमाणात प्राप्त होतात. अथर्ववेद हा गद्य पद्यरूपातील वेद आहे. मुंडकोपनिषदामध्ये असे म्हटले आहे अथर्ववेदाविषयी, “अथर्वेद: शिक्षा कल्प आदि!” याचा अर्थ असा आहे की ‘अथर्ववेद’ या वेदांमध्ये सामाजिक शिक्षण व सृष्टीचे आदि ज्ञान आहे. याखेरीज अथर्ववेदामध्ये अनेक चिकित्सा पद्धतीचा उल्लेख आहे. अथर्ववेदांमध्ये गृहस्थाश्रमाची कर्तव्ये, पती-पत्नी

व पुत्रांची कर्तव्ये, विवाहाचे नियम, मान-मर्यादाचे उत्तम विवेचन आहे. अथर्ववेदामध्ये शांती- पुष्टी व अभिचारिक या दोन्ही प्रकारचे अनुष्ठान वर्णित आहे. याशिवाय देवता, तपस्वी, ऋषी ब्राम्हण, धर्माचारी व देवराशी अभिचार करण्याचे मंत्रही अथर्ववेदामध्ये आढळतात. अथर्ववेदातील सर्वात मोठे सूक्त ८९ मंत्राचे आहे. हा वेद गद्यपद्यरूपात आहे.

## ब्राम्हण सूक्त अथवा जातवेद सूक्त

हे सूक्तदेखील ब्राम्हणांचे स्थान, गरिमा, योग्यता आणि कर्तव्याचे अत्यंत अत्युच्च वर्णन करणारे आहे. हे सूक्त अथर्ववेदाच्या १९ व्या कांडातील तिसरे सूक्त असून या सुक्ताचे ऋषी अथर्व आणि अंगीरा आहेत. या सूक्ताचे देवता अग्नी आणि ब्राम्हण आहे. या सूक्ताचे छंद त्रिष्टुप आणि भूरिक त्रिष्टुप आहेत. या सूक्ताच्या दोन्ही ज्या देवता आहेत मी त्यातील प्रथम देवतेचे अग्निदेवाचे स्पष्टीकरण सुरक्षा सूक्तात लिहिले आहे. द्वितीय देवतेचे -ब्राम्हण देवतेचेही स्पष्टीकरण यातुधान सूक्तात लिहिले आहे. म्हणून त्याविषयी मी स्पष्टीकरण या सूक्तात करत नाही.

हे सुक्त पुढील प्रमाणे:-

या सूक्तात चार मंत्र आहेत.

**दिवस्पृथिव्याः पर्यन्तरिक्षार् वनस्पतिभ्यो अध्योषधीभ्यः|**

**यत्र-तत्र विभूतो जातवेदास्तत स्तुतो जुषमाणो न एहि||**

**यस्ते अप्सु महिमा यो वनेषु य औषधीषु पशुष्वपस्वअन्तः|**
**अग्ने सर्वांस्तन्वइः सं रभस्व ताभिर्न एहि द्रविणो अजस्त्रः||**

**यस्ते देवेषु महिमा स्वर्गो या ते तनूः पितृष्वाविवेश |**

**पुष्टिर्या ते मनुष्येषु पप्रथेग्ने तया रयिमस्मासु दे**
**धेहि ||**

**श्रुत्कर्णाय कवये वेदयाय वाचोभिर्वाकैरुप यामि रातिम् |**
**यतो भयमभयं तन्नो अस्तव देवानाम् यज हेडो अग्ने||**

यातील प्रथम मंत्राचा असा अर्थ आहे की हे सर्वज्ञ आणि वेदाचे जन्मतः ज्ञान प्राप्त करणाऱ्या हे ब्राम्हण देवते ! आपली महती, कीर्ती, स्थान, गरिमा आणि योग्यता इतकी महान आहे की आपण ज्ञान, विज्ञान, धर्म, नीती, तत्त्वज्ञान आणि प्रज्ञारूपाने पृथ्वी,

स्वर्गलोक, अंतरिक्ष लोक आणि विभिन्न धर्मग्रंथांमध्ये विद्यमान आहात. आपण आमच्या अनुकूल होऊन आम्हाला ज्ञान व विद्या प्रदान  करावी.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे सर्वज्ञ अग्निदेवा ! हे सर्वज्ञ जातवेदा ! आपण पृथ्वी, द्युलोक, अंतरिक्ष लोक वनस्पती आणि औषधींमध्ये विशेषरूपाने विद्यमान राहता, कृपया प्रसन्नतापूर्वक आमच्याशी अनुकूल होऊन आमच्यावर कृपादृष्टी ठेवावी.

यातील द्वितीय मंत्राचा असा अर्थ आहे की हे ब्राम्हण देवते ! आपली महत्ता वर्णावी तितकीच थोडी आहे. युद्धामध्ये रणनीतीच्या रूपांमध्ये, शस्त्रांमध्ये धनुर्वेद रूपाने, शास्त्रांमध्ये धर्मशास्त्ररूपाने, वेदांमध्ये यजुर्वेद रूपाने आणि क्षत्रियांमध्ये सोमकवंशी, तर पृथ्वीवर ब्राम्हण रूपाने आपण आपले ज्ञान, आपली प्रज्ञा, आणि आपली मेधा वास करतात. आपण अशा असंख्य रूपाने राष्ट्राचे व लोकांचे कल्याण आणि उत्थान करत असतात .

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे अग्नि देवा ! आपले स्थान जलामध्ये वडवालनाच्या रूपाने, वनामध्ये दावानलाच्या रूपाने,

औषधींमध्ये फलपाक रूपाने पशुआदि सर्व जीवांमध्ये वैश्वानररूपाने, अंतरिक्षामध्ये विद्युतरूपाने विद्यमान आहात. या सर्व स्वरूपांनी आपण आम्हांला अक्षय समृद्धता प्रदान करतात.

यातील तृतीय मंत्राचा अर्थ आहे की हे ब्राम्हणदेवते ! देवतांकडे आपल्या वाणी आणि ऋत्विजेद्वारे यजुष, मंत्र, प्रार्थना, स्तवने, विधी आणि पवित्र सत्कर्मे प्रेषून देणारे, पितरांकडे अन्न आणि विधी प्रेषून देणार तथा मनुष्यांना मुक्ती, मोक्ष मार्ग प्रशस्त करणारे आपणच आहात. हीच आपली महिमा आहे. या सर्व रूपांमध्ये आपण राष्ट्र कल्याण आणि जनत्थान कार्यकरिता अनुकूल आहात, आपणच आम्हांला ज्ञान प्रदान करावे.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे अग्नि देवा ! देवतांकडे स्वाहाद्वारे द्रव्य म्हणजे हविष्य आणि यजुष पोहोचवणारे, पितरांकडे पंचगव्य म्हणजे भोजन पोहोचवणारे, तसेच मनुष्यांमध्ये जठराग्नीरुपाने पाचकाच्या रुपांमध्येही आपली महिमा आहे. या सर्व रुपांमध्ये अनुकूल होऊन आपण आम्हांला सुख प्रदान करावे.

यातील चतुर्थ मंत्राचा असा अर्थ आहे की हे ब्राम्हण देवते ! स्तुती, यजुष आणि मंत्रांना रचण्यांमध्ये व वेदांचे ज्ञान प्रसृत करण्यामध्ये सक्षम, अतिंद्रिय ज्ञान म्हणजे पराविद्येला जाणणारे सर्वज्ञानी, सर्वाभीष्ट  कार्य करणाऱ्या, आपणा ब्राम्हणदेवतेची आम्ही वंदना करत आहोत. हे ब्राम्हण देवते ! आमचे अज्ञानाविषयीचे भय दूर करावे. आपण देवतांचे व राजाच्या प्रकोपाला दूर करावे.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे अग्नि देवा ! श्रुतिंना म्हणजे वेदांना निर्माण करणारे, इंद्रिया पलीकडे असलेल्या क्षमता आणि सिद्धींनी युक्त, सर्वज्ञ व अभिष्ट फलदाता असणाऱ्या अग्नीदेवतेची वंदना करत आहोत. हे अग्निदेवते !आम्हाला ज्याचे भय वाटते त्यापासून निर्भयता प्राप्त व्हावी व अभय मिळावे. आपण आमच्याप्रति देवतांचा रोष दूर करावा. या सुक्तामध्ये ब्राम्हण आणि अग्नीमध्ये असलेली साम्यता, ब्राम्हणांचे स्थान, ब्राम्हणांची योग्यता आणि कर्तव्य स्पष्ट केलेली आहेत. याखेरीज अग्नी आणि ब्राम्हणांची सर्व व्यापकता स्पष्ट केलेली आहे.

# यातुधाननाशन / अग्निदेवस्तवन / ब्राम्हणशक्तिवर्णन सूक्त

हे सूक्त अथर्ववेदाच्या प्रथम कांडातील ७ वे सूक्त आहे. ह्या सूक्ताची ऋषि चातन आहे. ह्या सूक्ताची देवता ब्राम्हण, अग्नि, अग्नींद्र हे आहेत. ह्या सूक्ताचे छंद अनुष्टुप आणि त्रिष्टुप आहे. या सूक्ताचे एकूण सात मंत्र आहेत.

ह्या सूक्ताचे नाम पाहता, 'यातुधाननाशन' 'यातुधान' म्हणजे अशा दुष्ट व्यक्ती, शक्ती, आत्मा अथवा कर्म, जी धर्मविरोधी व नीतीविरोधी असतात तथा देवता व ऋषींची शत्रू असतात. ती आजही आपल्या आजूबाजूला उपस्थित आहेत, त्यांच्या नाशाकरिता हे सूक्त आहे. अग्निदेव स्तवन म्हणजेच या सूक्तामध्ये अग्निदेवाच्या सामर्थ्य, शक्ती, तेज व ज्वलंतेतेची स्तुती केलेली आहे.

‘ब्राम्हणशक्तिवर्णन’ अथवा ब्राम्हण शक्तिस्तवन म्हणजे ब्राम्हणांच्या शक्ति, सामर्थ्य, योग्यता व समाजात असणाऱ्या स्थानाचे वर्णन व स्तवन करणारे हे सूक्त. ब्राम्हणांच्या स्वभाव विशेषांचेही वर्णन या सूक्तात आढळते.

प्रथम देवता ब्राम्हण आहे. ब्राम्हण म्हणजे विप्र हा धगधगत्या अग्निप्रमाणे, असे मानले जाते. ब्राम्हण हा सर्वोच्च वर्ण असून ब्राम्हण हा अन्य तिन्ही वर्णांना पूजनीय असतो. कारण ब्राम्हण म्हणजे ईश्वर, ब्रम्ह, परब्रम्ह, आत्मा, परमात्मा, त्यांना जाणणारा मेधावी आणि विद्वान होय. ब्राम्हणांच्या जीवनाचा व वर्तनाचा मूलाधार वेद असतो, त्याकारणेच प्रत्येक शुभ व अशुभ संस्कारामध्ये म्हणजे सोयरापासून सुतकापर्यंतचे, नामकरणापासून दहनापर्यंतचे सर्व संस्काराचे विधी ब्राम्हण पुरोहितच करतो. याखेरीज ब्राम्हणाला समाजपुरुषाचे मुख अथवा मस्तक मानले जाते. ज्याप्रमाणे अग्निला देवतांचे मुख मानले जाते. यावरुनच समजते वर्णव्यवस्था व समाजव्यवस्थेत ब्राम्हणाचे किती महत्त्वाचे स्थान असते ते!

म्हणजेच ब्राम्हण हा समाज पुरुषांची बुध्दी, वाणी, ज्ञान आणि प्राण असतो.

समाजविघातक व धर्मविरोधी व्यक्ती, शक्ती आणि सत्ता, समुदाय समाजप्रबोधकांच्या छद्म वेषांमध्ये ब्राम्हणांना प्रहार करताहेत, अनंत काळापासून. मात्र त्यांना हेच कळत नाही की समाज पुरुषाचे बाहू, उरु आणि चरण हे अंग महत्त्वाचे असले तरी समाजपूरुषाला मस्तकच नसेल तर तो कसा जिवित राहू शकतो? जरी एखादे अंग नसले अथवा विकलांग असले तरी मनुष्य मस्तक अथवा आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर आपला विकास अथवा प्रगती करू शकतो. याउलट अल्प बुध्दी असलेल्या व्यक्ती धडधाकट असूनही अनियंत्रित वर्तन करतो. याखेरीज त्याच्या वर्तनात बदल घडवून आणणंही अवघड ठरते. म्हणजेच मतिचे , बुध्दिचे जीवनामध्ये, तर समाजामध्ये ब्राम्हणाचे स्थान महत्त्वाचे असते.

माझ्या या मतावर काही लोक म्हणतील ब्राम्हणाला महत्त्वाचे स्थान देणे म्हणजे जातिव्यवस्थेला बढावा देणे. मात्र जातिव्यवस्था व वर्णव्यवस्था याचा अर्थ खरं त्यांना कळलेला नसतो. जातिव्यवस्था म्हणजे कर्मानुसार व प्रांत नुसार, मनुष्याच्या ( गुणधर्म नुरुप) कार्याचे पडलेले विभाग. वर्णव्यवस्था म्हणजे आजन्म स्वीकारलेल्या कर्मानुरुप मनुष्याचे ठरवलेले स्थान होय. उदा. कोणीही क्षत्रिय श्रुतीच्या ज्ञानाकारणे श्रोत्रिय म्हणजे ब्राम्हण होऊ शकतो व कोणीही ब्राम्हण आपल्या पराक्रमाकारणे क्षत्रिय होऊ शकतो

जातिव्यवस्थेचे उदा. पाहता, ब्राम्हणांमध्ये सारस्वत, गौड, अग्निहोत्री व देशस्थ, द्विवेदी व त्यागी अशा मुख्य जाती आहेत. गौड प्रांतातील (बंगालच्या) ब्राम्हण म्हणजे गौड ब्राम्हण, अग्निहोत्राचा प्रसार- अंगीकार करणारे म्हणजे अग्निहोत्री, सरस्वतीचा आशिर्वाद असणारे प्रतिभाकलासंफन्न ब्राम्हण म्हणजे सारस्वत, देशस्थ म्हणजे देशामध्ये सर्वत्र संचार करणारे, दानी प्रवृत्तीचे  व संन्यस्त प्रवृत्तीचे ब्राम्हण म्हणजे त्यागी, वेदी,

त्रिवेदी आणि चतुर्वेदी म्हणजे एक, दोन, तीन अथवा चार वेदांचे पूर्ण अध्ययन केलेले ब्राम्हण.

यावरुनच कळते की जाति ही प्रांत, गुण, गुणधर्म व कर्मावरुनही जाणली जाते.

द्वितीय देवता अग्नि आहे. मी देवतेविषयी संपूर्ण स्पष्टीकरण सुरक्षा सूक्तामध्ये लिहिले आहे. त्याकारणे मी या सूक्तात अग्निदेवाविषयी स्पष्टीकरण लिहित नाही.

तृतीय देवता आहे, ती अग्निंद्र. कदाचित अग्निला इंद्र व देवराजाच्या स्थानावर ठेवून ह्या देवतेची संकल्पना केली असेल. याखेरीज इंद्र व अग्निला एकाकार तसेच एकरुप मानून सामवेदातही इन्द्राग्नी सूक्त रुपाने त्यांची प्रार्थना केलेली आढळते. इंद्र व अग्नी एकरुप मानले जातात. याखेरीज ते एकमेकांचे. सहाय्यक आणि मित्र मानले जातात. या सूक्तामध्ये अग्नि हा इंद्राचा इंद्र म्हणून देवता असावा.

हे सूक्त पुढीलप्रमाणे आहे:-

**स्तुवानमग्न आ वह यातुधानं किमीदिनम् |**
**त्वं हि देव वन्दितो हन्ता दस्योर्बभूविथ ||**

**आजस्य परमेष्ठिञजातवेदस्तनवशिन् |**
**आग्नेय तौलस्य प्राशान यातुधानान् वि लापय ||**

**विलपन्तु यातुधाना अत्त्रिणो किमीदिनः |**
**अथेदमग्ने नो हविरिन्द्रश्च प्रति हर्यतम् ||**

**अग्निः पूर्ण आ रभतां प्रेन्द्रो नुदतु बाहुमान् |**
**ब्रवीतु सर्वो यातुमानयमस्मीलेय ||**

**पश्याम ते वीर्यं जातवेदः प्र तो ब्रूहि यातुधानान् नृचक्षः |**

**त्वया सर्वे परितप्ता: पुरस्तात त आ यन्तु प्रबुवाणा उपेदम्||**

**आ रभस्व जातवेदोस्माकार्थाय जज्ञिषे |**
**इतो नो अग्ने भूत्वा यातुधानान् वि लापय ||**

**त्वमग्ने यातुधाननुपबध्दां इहा वह |**
**अथैषामिन्द्रो वज्रेणापि शीर्षाणि वृश्चतु ||**

यातील प्रथम मंत्राचा असा आशय आहे की ब्राम्हण हा स्वतःच्या प्राणांचा धोका पत्करून त्या व्यक्तींमध्ये धर्मप्रसाराचे कार्य करतो, ज्या व्यक्ती सदाचाराचा त्याग करुन कदाचारामध्ये जीवन व्यतीत करतात. त्यांच्यात परिवर्तन आणि सुधारणा घडवून आणण्याचे कार्य ब्राम्हण करतो आणि त्या सर्वांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्यही करतो.

या मंत्रात अशी प्रार्थना केली आहे की हे सत्य,धर्म, ज्ञान आणि नीतीद्वारे लोकांना उन्नती पंथावर घेऊन जाणाऱ्या

ब्राम्हणा! तू समाजात स्तुत्य कार्य करणारा आहेस. आजपर्यंत हे सर्व दस्यु, चोर, कुकर्मी आणि दुराचारी, अन्यगणांना पिढीचे आंदण देत होते आणि दुसऱ्यांना लुटत होते. हे सर्व दस्यु आणि अधर्मी इतरांना पीडा देऊन व त्यांची संपत्ती अन्यायाने हिरावून त्यांचा भोग घेत होते. मात्र हे ब्राम्हण देवता! हे ज्ञानी पंडिता! तू आपल्या ज्ञानाद्वारे व तेजाद्वारे यांचे जीवन परिवर्तन व मनपरिवर्तन केले आहेस. म्हणून तू संपूर्ण समाजासाठी वंदनीय आहेस. कारण ज्या दस्युंचे परिवर्तन होत नाही, तू त्यांचा नाश करतोस राष्ट्र कल्याणासाठी.

म्हणजेच राष्ट्रांमध्ये ब्राम्हण हे अग्नी आणि देवतेसमान असतात, जे समाजातील दुष्ट लोकांच्या मनोवृत्तीचे परिवर्तन घडवून आणून त्यांना समाजाचा प्रवाहात आणतात अथवा राष्ट्र कल्यानासाठी त्यांचा नाश करतात.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे अग्नि देवा! आम्ही आपली वंदना व स्तुती करत आहोत. आपणास नमस्कार असो. दुष्ट कर्म करणाऱ्या व अधर्मात रत असणाऱ्या शत्रूंमध्ये आपण परिवर्तन

घडवावे अथवा नश्यन करावे. आमच्याद्वारे वंदित आणि स्तुत्य असणारे हे अग्नीदेव आमच्या शत्रूंच्या दुष्ट मनोवृत्ती, कर्म, अधर्म व दुर्बुद्धीचे निवारण करावे.

त्यातील द्वितीय मंत्राचा अर्थ आहे की हे परमेष्ठि उच्च स्थानावर असणाऱ्या प्रकृती व जीवाच्याही वर उठून परमात्म्यांमध्ये स्थित होणाऱ्या, जन्मजात वेदाचे ज्ञान ग्रहण, ज्ञानाचा प्रकाश प्राप्त करणाऱ्या, आपल्या शरीर, मन, वासना, इच्छा व महत्त्वकांक्षांना वशीभूत करणाऱ्या ज्ञानप्रकाशाद्वारे उन्नतीचे (राष्ट्राच्या) कारण ठरणाऱ्या हे ब्राम्हणा!( म्हणजे हे सर्व वर्णिलेले गुणधर्म ब्राम्हणाचे असतात, असे सांगितले आहे) हे परमेष्ठि ब्राम्हणा! तू स्वतःच्या भोजनात माखन, तूप, तेल आणि दही अशा मेद वाढवणाऱ्या पदार्थांचा तोलून उपयोग कर. ( म्हणजे कमी उपयोग कर) तसे भोजन संतुलित असावे. अनेक प्रथिने व जीवनसत्वांनी युक्त व परिमित म्हणजे शरीराला उपयोग असणाऱ्रा, प्रमाणात असणारा आहारच तुझे स्वास्थ उत्तम राखेल. कारण तुला धर्मप्रसार, समाजसुधार, राष्ट्रकल्याण व दुष्ट नाशाचे कार्य करायचे आहे. तू तुझ्या संयत प्रवृतीने दृष्ट लोकांना परास्त

करावेस, त्यांना विचार प्रवृत्त करावेस, जेणेकरून दुष्ट लोकांच्या वृत्तीमध्ये परिवर्तन व्हावे अथवा राष्ट्राचे कल्याण व्हावे.

म्हणजेच ब्राम्हण हा धगधगत्या अग्नीप्रमाणे असला, तरी त्याने यज्ञ कुंडामध्ये असणाऱ्या पवित्र अग्नीप्रमाणे मर्यादा संपन्न आणि संयत असावे. त्याने आपल्या वासना व कामनांवर विजय मिळवावा व संतुलित आहार घ्यावा

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, उच्च स्थानावर आसीन, ज्ञानाचे पुंज, जठराग्निच्या रुपाने शरीराचे संतुलन राखणारे अग्निदेव! आमच्याद्वारे सुवर्णमात्रातून तोलून आहुती म्हणजेच माखनाप्रमाणे मधुर असणारी आहुती ग्रहण करावी. आमच्या समर्पणावर व भक्तीवर प्रसन्न होऊन आपण दुष्ट -दुराचारी शक्तींना, व्यक्तींना विलापप्रवृत्ती करावे म्हणजे त्यांचा विनाश करावे.

तृतीय मंत्राचा अर्थ आहे की ब्राम्हणांचा धर्मप्रसार म्हणजेच धर्म, सत्य, नीती आणि अध्यात्माचा प्रसार असा व्हावा की त्याच्या प्रभाव दुष्ट व्यक्ती, आसूरी शक्ती, समाजविघातक लोक

आणि अन्य शत्रू तसेच राक्षस व पिशाच्चवर पडावा, दुष्प्रभाव अथवा सुप्रभाव!  हे यातुधान म्हणजे राष्ट्रविरोधक लोक आणि दुष्ट दस्यु, जे प्रजेला व सज्जनांना त्रस्त करत असतात, प्रतिक्षण अपरांचे अहित चिंतणारे व सदा अस्वस्थ असतात, स्वतःच्या आसुरी आनंदासाठी अपरांच्या सुख, अधिकार,समृद्धता, मनशांती, सन्मानाचे भक्षण करणारे असतात. त्यांनी पश्चाताप, भय अथवा स्वनाशाकारणे शोक करावा व विलाप करावा. एकतर त्यांना आपल्या हीन कर्माचे क्रमशः स्मरण व्हावे व त्यांचे मतपरिवर्तन व्हावे अथवा त्यांच्या संहार व्हावा. याखेरीज या परिवर्तन व सुधारण्याच्या कार्यात सामान्य जनतेची असे कर्तव्य आहे की त्यांनी आपल्या परीने या कार्यात आहुती द्यावी. आपल्या परीने या कार्यात खारीचा वाटा उचलावा, म्हणूनच आम्ही ब्राम्हण देवतेला अशी प्रार्थना करतो आहोत की अद्य परिस्थितीमध्ये हे ज्ञान प्रसारक ब्राम्हणा ! पंडिता ! आपण आणि शासक राजा -राज्यकर्ता एकत्रित होऊन आमच्या या वाट्याला प्रेमपूर्वक स्वीकारावे म्हणजे आम्ही आपल्या कार्यात जो सहभाग

दिला आहे, त्याचा आदर करावा. कारण आमच्या सहभागाकारणेच राष्ट्राच्या उत्थानास हातभार लागतो.

म्हणजेच जनतेच्या सहयोगाकारणेच राजा आणि ब्राम्हणाचे कार्य अधिक सुलभ होते.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे अग्नीदेवा! सज्जनांना व ब्रम्हज्ञानींना पीडा देणारा, स्वतःचा स्वार्थ करून इतरांचे प्राण व धर्म विपदेत लाटणाऱ्या समाज आणि साधकांच्या शत्रूंना आपला विलास पाहून रुदन करू द्यावा. हे अग्नि देवा ! आपण इंद्रासहित आमचे हविष्य ग्रहण करावे. आम्हाला सत्कर्माच्या दिशेने प्रेरित करावे.

यातील चतुर्थ मंत्राचा असा अर्थ आहे की हे ज्ञान प्रसाराद्वारे उन्नती पथावर राष्ट्राला घेऊन जाणाऱ्या ब्राम्हणा ! तू आपले कार्य उत्तमरीतीने व सुरक्षितपणे कर. तुझ्याच स्कंधावर म्हणजे बाहुंवर आणि मस्तकावर राष्ट्रशक्ती, राष्ट्राचे उत्थान, राष्ट्राचे कल्याण आणि राष्ट्र शिक्षणाचे दायित्व आहे. म्हणूनच तू बहुमान् म्हणजे शक्तिशाली व ज्ञानदायी असावेस आणि राजाला राष्ट्रकल्याण व राष्ट्रोत्थानासाठी प्रेरित करावेस. याखेरीज राजाने

ब्राम्हणांना पूर्णता समर्थन द्यावे. हे कार्य इतके उत्तम व्हावे की प्रजा,व सज्जन ब्राम्हण व विद्वाजनांना पीडा देणारे दुष्टजन प्रभावित होऊन ब्राम्हणांपुढे व राजापुढे त्यांनी असे म्हणत समर्पण करावे की मी आपल्या शरणार्थी असून मला माझे अपराध मान्य आहेत. मला दंडित करावे,की जेणेकरून मी असन्मार्गापासून सदैव परावृत्त व्हावे.

म्हणजे राष्ट्र व राजशक्तीचा मूळस्तंभ ब्राम्हणव्हावे.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे अग्नि देवा ! असुर विनाशाचे कार्य आरंभ करावे. बलशाली इंद्राला म्हणजे आत्म्याला प्रेरणा द्यावी. हया उभयंताच्या प्रभावाकारणे आसुरी शक्तींनी साधकांपुढे समर्पण करावे.

यातील पंचम मंत्राचा असा अर्थ आहे की राजा ब्राम्हणाला प्रार्थना करतो आहे की हे जन्मजात वेदाचे ज्ञान प्राप्त केलेल्या व आजन्म त्याच्या प्रसार करणाऱ्या ब्राम्हणा ! दुष्टजनांचे मतपरिवर्तन करणाऱ्या ज्ञानी पंडिता ! मनुष्यासाठी मार्गदर्शनाचे कार्य करणाऱ्या विप्रा ! आम्ही तुझा पराक्रम, सामर्थ्य, बुद्धी, शक्ती, प्रज्ञा, ज्ञान व संयम पाहतो आहोत. तुझ्या या सर्व गुणांना

प्रणाम असो. या प्रजापीडक, सज्जन ब्राम्हणपीडकांच्या प्रति असलेला आमचा संदेश कथित कर. माझा संदेश असा आहे की यातुधानम म्हणजे दुष्टत्व त्यागून सज्जनाचे जीवन जगावे, यातच राष्ट्राचे आणि तुम्हा सर्वांचे कल्याण आहे. हे ब्राम्हणा ! तुझी शक्ती यातच आहे की त्या दुष्टासमोरही स्वतःचे प्राण, धर्म, नीती व सामर्थ्याचे तू रक्षण करू शकतोस. हे ब्राम्हणा ! तुझ्या तेजाने, ज्ञानाने, उपदेशाने प्रभावित होऊन हे सर्व दुष्टगण संताप व पश्चातापाच्या अनुभव घेत स्वतःच आमच्या समोर येतील, स्वतःचे लपण्याचे स्थान सोडून. ते आपल्या पश्चातापाला अथवा दुष्टतेला वाव देत आमच्याजवळ येतील. ते समर्पण करतील अथवा युद्ध करतील म्हणजेच युद्ध, धर्म, नीती, सत्य, तत्त्वज्ञान, विज्ञान व दूतत्व आणि आदि कर्मामध्ये ब्राम्हणाची शक्ती व योग्यता असीम असते.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे ज्ञानस्वरूपा अग्नीदेवा ! आम्ही तुमच्या प्रकाशरुपी पराक्रम पाहत आहोत, त्याचे स्तवन करत आहोत. आपण पथभ्रष्टांचे मार्गदर्शक आहात, आपण आपल्या सत्प्रभावाने आसुरी व्यक्ती व शक्तींना सन्मार्गाला प्रेरित करावे.

आपण आज्ञा देऊन आसुरी शक्तींना प्रायश्चित करण्याकरिता प्रवृत्त करावे.

यातील षष्ठम मंत्राचा असा अर्थ आहे की हे जन्मजात वेदांचे ज्ञान प्राप्त असणाऱ्या व ज्ञानाचा -सत्याचा प्रसार करणाऱ्या ब्राम्हणा ! तू आपल्या कार्यात सुखपूर्वक आरंभ कर. राष्ट्राचे उत्थान व सुख आणि प्रगतीसाठी, आमच्या महान कार्यासाठी तुझा संभव झाला आहे. राजाचे कर्तव्य असते – परिपालन, प्रजापालन. प्रजापत्याची दोन मुख्य कार्य असतात, १. बाह्यशत्रूचा नाश २. दुर्जनाचे मतपरिवर्तन करणे, त्यांना ज्ञान व दंड देणे. यातील प्रथम कार्य क्षत्रिय, द्वितीय कार्य ब्राम्हण करतो. राजा ब्राम्हणाला प्रार्थना करतो की हे ज्ञानप्रसार, उन्नती कार्य, धर्मकार्य आणि राष्ट्रकल्याणकरिता सदैव अग्रसर राहणाऱ्या ब्राम्हणा ! तू आमचा संदेश वाहक व ज्ञान वाहक होऊन यातुधान अथवा दुर्जनांना विचार प्रवृत्त कर, त्यांना पश्चाताप अथवा स्वनाशांच्या भयाने विलाप करण्यासाठी प्रवृत्त कर, त्याचे कल्याण अथवा नश्यन कर.

म्हणजे राष्ट्रोत्थान आणि जनकल्याण्याच्या कार्यात ब्राम्हणांचा सहयोग सर्वाधिक असतो.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे जातवेदा ! हे अग्नि देवा ! आपण सर्व शुभ आणि पवित्र कार्याचा आरंभ आहात, मुलाधार आहात. आपण आम्हा याजक, पुरोहित, पूजक, होत्री-होतारांचे प्रतिनिधी होऊन दुष्टजनांचा नाश करावा अथवा त्यांना पश्चाताप व प्रायचित्त प्रदान करावे.

सप्तम मंत्राचा असा अर्थ आहे की हे ज्ञान प्रसारका ब्राम्हणा ! तू पश्चाताप करणाऱ्या व पुढे जीवनात पातके न करणाऱ्या त्या सुधारित दुष्टजनांना आपल्या ज्ञान, तेज, सुप्रभाव आणि प्रज्ञेद्वारे समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणारा आहेस. हे ब्राम्हणा ! तुझे ज्ञान व तेज अपूर्व असले तरी कोणी यातुधान म्हणजे दुर्जन आपल्या वर्तनात सुधारणा दाखवत नसेल तर मी व तू, आपण सर्वजण त्या आसुरांचा म्हणजे दृष्टांचा संहार करु, अत्यंत कठीण शस्त्रांनी. ( जी वज्राप्रमाणे भयंकर आहेत) निश्चयाने या दृष्टांच्या शिरच्छेद करूया, ज्याप्रमाणे वाईट अंगाला विलग केले जाते, पदार्थाच्या वाईट घटकाचे विघटन केले जाते, त्याप्रमाणे

दुर्जनांमध्ये सुधारणा होत नाही तत्समयी राजा व ब्राम्हण त्या दृष्टाला दंड देऊन त्याचा अंत करतात.

म्हणजे ब्राम्हणच मनोशिक्षणाचे कार्य करुन दस्यु, अनार्य, यातुधान आणि दुर्जनांचे मतपरिवर्तन करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणतो.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे अग्नि देवा ! हे मार्गदर्शक जातवेदा ! आपण दुराचारींना वधस्थळावर येण्याकरिता प्रवृत्त वा बाध्य करावे व इंद्रदेवाने वज्राने त्या दुष्टाचे मस्तकोच्छेदन करावे.

अशाप्रकारे या सूक्ताच्या प्रथम मंत्रांमध्ये दस्युच्या दस्युत्वाचा म्हणजे दुष्टांच्या दस्युत्वाचा नाशांचा उल्लेख आहे. म्हणजेच संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीतील पसायदानातील ‘दुरितांचे तिमिर जावो!’ अशा ओवीच्या उदयाचे मूळही या मंत्रात सापडते. द्वितीय मंत्रामध्ये ब्राम्हणाचा आहार व उपयुक्त आहाराचे वर्णन आहे याशिवाय ज्ञानाचेही. तृतीय मंत्रांमध्ये जनतेने सहयोग दिला पाहिजे असे सूचित केले आहे. चतुर्थ व पंचम मंत्रामध्ये ब्राम्हणांच्या शक्तीचे व योग्यतेचे वर्णन केले आहे. षष्ठम मंत्रामध्ये

ब्राम्हणांचे प्रजा रक्षण, राष्ट्र कल्याण व राष्ट्रोत्स्थान कार्यामध्ये योगदान स्पष्ट केले आहे. सप्तम मंत्रांमध्ये दुर्जनाला एक सुधारण्याचा अवसर द्यावा. मात्र त्याने अधिक प्रताडित केल्यास त्याच्या वध करावा, अशी प्रल्हाद नीती व द्रौपदी नीतीत आढळते.

# भुवनपति सूक्त

हे सूक्त अर्थववेदाच्या द्वितीय कांडातील द्वितीय सूक्त आहे. या सूक्ताची ऋषिका 'मातृनामा' आहे. मातृनामा म्हणजे जी मातृदेवी आहे ती, अथवा जिला 'मातर' म्हणजे माता असे संबोधले जाते, अशी स्त्री. मातृनामा अथवा मातृदेवी हा शब्दच सर्वव्यापी मातृसत्तेला उद्देशून म्हटल्याचे मानले जाते. कौशिक सूत्राच्या आधारावर सायण, यास्क आदि या आचार्यांनी या ऋषिकेचे नाम 'त्रिसंध्या-मणि' अथवा 'सद्पुष्य'या ऋषिकांनी जोडले आहे.

या सूक्ताची देवता गंधर्व व अप्सरा समूह आहे. गंधर्व म्हणजे गं, गं म्हणजे भूमी किरण, पानी व इंद्रिय बोध होय तर धर्व या अक्षरांचा अर्थ धारक व पोषक. अप्सरा -अप् सरस् म्हणजे सुष्टी प्रारंभाला उत्पन्न झालेले मूल क्रियाशील तत्त्व आहे, हेच ऋग्वेदातही सांगितले आहे. ह्या सूक्ताचे छंद त्रिष्टुप, विराट जगती, विराट गायत्री व भुरिमनुष्टुप आहेत. ह्या सूक्तात ५ मंत्र आहेत. ह्या सूक्तात अंतरिक्ष व प्रकृतीची संचालनावर आधारित मंत्र आहेत.

हे सूक्त पुढीलप्रमाणे:-

**दिव्यो गन्धर्वो भुवनस्य यस्पतिरेक एवं नमस्यो**
**विक्ष्वीड्य:|**
**तं त्वा यौति ब्रम्हणा दिव्य देव अस्तु दिवि ते सधस्थम् ||**

**दिवि स्पृष्टो यजत: सूर्यत्वगवयाता हरसो दैव्यस्य|**
**मृडाद् गन्धर्वा भुवनस्य यस्पतिरेक एवं नमस्य: सुशेवा:||**

**अनवदयाभि: समु जग्म अभिरप्सरास्वभि गन्धर्व आसीत |**
**समुद्र आसां सदनं म आहुर्यत:  सदय आ च परा चयन्ति||**

**अभ्रिये दिदयुन्नक्षत्रिये या विश्वावसुं गन्धर्वं सचध्ये|**
**ताभ्यो वो देवीर्नम इत् कृणोमि||**

**या: कलन्दास्तभिषीचयोक्षकामा मनोमुह:|**
**ताभ्यो गंधर्वपत्नीभ्योप्सराभ्योकरं नम:||**

यातील प्रथम मंत्राचा असा अर्थ आहे की जे दिव्य गंधर्व पृथ्वी आदि लोकांना धारण करणारे एकच पति किंवा स्वामी आहेत, तेच या जगतात नमस्य म्हणजे नमस्कार करण्यास योग्य आहेत. हे परमात्मान् , हे परब्रम्हा! आपला निवास द्युलोकामध्ये आहे. आम्ही मंत्रसाधना व तंत्रविद्याचे साधक आपल्याला नमस्कार करतो आहोत तथा आपणांशी आमची उपासनेकारणेच भेट घडत आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहता, जे दिव्य सज्जन, योगी, साधक, भक्त, सिध्द, तपस्वी -तपस्विनी ब्रम्हांडाच्या व पृथ्वीच्या पुण्याईला, सत्त्वाला, धर्माला व सत्याला धारणही करतात, तेच या जगतात वंदनायोग्य व पूजनीय आहेत. कारण त्यांच्यामुळे विश्व, धर्म, नीतीमत्ता व सत्त्व टिकून आहे.

याखेरीज हे परमात्मा! हे परब्रम्हा! तुझा निवास चराचरात आहेच, याशिवाय दयुलोक व अंतरिक्षातही तुझे स्वतंत्र अस्तित्त्व आहे.

हे परमप्रकृती! जे साधक तंत्रोक्त, शास्त्रोक्त, वेदोक्त, मंत्रोक्त साधना करतात, ती सर्व साधना आपल्यापर्यंत पोहोचते व आपण त्यांना म्हणजे साधकांना वांछित लोक प्रदान करतात.

यातील दुसऱ्या मंत्राचा अर्थ असा आहे की समस्त लोकांचे एकमात्र अधिपति गंधर्व, जे द्युलोकामध्ये विद्यमान आहेत, जे दैवी आपदांचे निवारक तथा सूर्याच्या त्वचेच्या रुपाचे आहेत, तेच नमस्य म्हणजे सर्वांद्वारे नमस्काराच्या योग्य तथा सुशेव म्हणजे सर्वांद्वारे प्रार्थना करण्यायोग्य आहेत. सर्वांचे फलदाते असलेले गंधर्व आम्हांलाही सुख प्रदान करतात.

अध्यात्म दृष्टीने पाहता, समस्त लोकांना व पृथ्वीला धारण करणारे एकमात्र अधिपति म्हणजे परमात्मा व परमप्रकृती, जे सर्व लोकांमध्ये विद्यमान आहेत, त्रिविविध तापांचे निवारक आणि सर्वांचे सरंक्षक आहेत, तेच पूजनीय व वंद्य आहेत. सर्व कर्म, साधना, मंत्र व तपाचे फलदाता हे परमात्मा व परमप्रकृती! आम्हालांही परमानंद प्रदान करावा.

यातील तिसऱ्या मंत्राचा असा अर्थ आहे की प्रशंसनीय रुप असलेल्या अप्सरांकारणे त्यांचे पती अथवा स्वामी गंधर्व परिपूर्ण आहेत. ह्या अप्सरांचा निवास अंतरिक्ष आणि स्वर्ग असून या अप्सरांचा जन्म समुद्रातून झाला आहे. आम्हांला हे सांगण्यात आले आहे की ह्या अप्सरा जेथून प्रकट होतात, त्यांच्यातच विलीन होऊन जातात.

अध्यात्म दृष्टीने पाहता, स्तुतनीय असलेली, असे अनेक रुप धारण करणाऱ्या परमप्रकृती अर्थातच आदिशक्तीकारणे तिचा सहचर असलेला आदि पुरुष परमात्मा परिपूर्ण व पूजनीय आहे. आदिशक्तीच्या अनेक अनंत रुपांचा निवास अंतरिक्ष व दयुलोक असून या रुपांचा जन्म आदिशक्ती या सत तत्वातून झाला आहे. ही अनेक रुपे जेथून प्रकट होतात, त्याच आदितत्त्वामध्ये विलीन होतात.

यातील चौथ्या मंत्राचा असा अर्थ आहे की हे देवीहो! हे अप्सरागणहो! आपण मेघांच्या विद्युतप्रमाणे अथवा नक्षत्रांच्या लोकांप्रमाणे संपूर्ण विश्वाचे पालन करणाऱ्या गंधर्व देवांशी संयुक्त

आहात, त्यांच्याशी जोडलेल्या आहातच म्हणून आम्ही आपणांस नमन करत आहोत.

हा मंत्र वैज्ञानिक आहे. विजेच्या म्हणजे विद्युत आणि नक्षत्रांच्या प्रभावाने त्यांची किरणे प्राण्यांमध्ये प्राणरस -जीवनरस स्त्रवत असतात, हेच या ऋचेतून सुचवायचे आहे

अध्यात्म दृष्टीने पाहता, चपला म्हणजे लक्ष्मी व नक्षत्रे म्हणजे नवग्रहांच्या प्रभावाकारणेच धारक तत्वांना गति प्राप्त होते. अन्य शब्दांमध्ये पाहता ज्या परमप्रकृतीकारणे धारकतत्व असलेल्या परमात्मा क्रियाशील होतो, तिला कोटी कोटी प्रणाम असो.

यातील पाचव्या मंत्राचा असा अर्थ आहे की ज्या प्रेरणादायिनी आहे, ज्या ग्लानी व व्याधी दूर् करणारी आहे, ज्या नेत्रा्ंचे पारणे फेडणारी असून नेत्रांना दृष्टी व शक्ती देते, ज्या मनाला संमोहित करतात, ज्या गंधर्व पत्नी रुपात असूनही अप्सरा आहेत, त्यांना नमस्कार असो.

हा मंत्र अप्सरांच्या साधना-आराधनेकरिता व चौसष्ट कला आत्मसात करण्याकरिता उपयुक्त आहे.

हा देखील मंत्र विज्ञानमय आहे. सूर्याची किरणे अथवा प्रकाश किरणे नेत्रांना उत्तम चेतना व दृष्टी देतात आणि मनासही तंरगित करतात.

अध्यात्म दृष्टीने पाहता, जी प्रेरणा, प्राणधारा, सूर्य रश्मी, स्फूर्ती, तेज आणि शक्तींची स्वामिनी आहे, जिचे दर्शन नेत्रांचे पारणे फिटवते व नेत्रांना शक्तीही देते, जी मोहिनी व संमोहिनी विद्यांची जननी आहे, जी प्राणधारा होऊन नेत्रादि शरीराच्या सर्व अवयवांना उत्तम पोषण व तोषण प्रदान करते, जी मनाच्या विचारांना तरंगित करु शकते, त्या आदिशक्तीला -परमप्रकृतीला आम्ही नमन करतो आहोत.

# महदब्रम्ह सूक्त

हे सूक्त अर्थववेदातील प्रथम कांडाचे ३४ वेळ सूक्त आहे. हे सूक्त परब्रम्हाचे म्हणजेच ब्रम्हाचे अस्तित्व, औषिधींची महत्ता, द्युलोक व पृथ्वीची स्तुती अंतरिक्षाचे स्तवनावर आधारित आहे. या सूक्ताचा ऋषी ब्रम्हा असून या सूक्ताची देवता पृथ्वी म्हणजे द्युलोक व पृथ्वी लोक तसेच स्वयं ब्रम्ह- परब्रम्ह आहे. या सूक्ताचे छंद अनुष्ठुप आणि ककुम्मती अनुष्टुप आहे. या सुक्ताच्या ऋषीविषयी- ब्रम्हाविषयी दोन संभाव्यता सांगितल्या जातात. एक म्हणजे श्रेष्ठ - श्रेष्ठतम यज्ञांच्या अर्ध्वयू -होताराचे नावही ब्रम्हच होते. द्वितीय म्हणजे त्रिदेवांपैकी एक असलेला सृष्टि कर्ता ब्रम्हा. मला तर वाटते श्रेष्ठतम यज्ञाचा अर्ध्वयू होतार ब्रम्हा आणि सृष्टीचा निर्माता- कर्ता ब्रम्हा एकच असावा. कारण असेही म्हटले जाते की ब्रम्हाने अनेक यज्ञ केले होते, देवतासह, गायत्री मातेसह आणि सरस्वती देवीसह. आणि ब्रम्हदेव, गायत्री माता व सरस्वती देवीलाच यज्ञदेवाचा जनक व जननी म्हटले जाते म्हणूनच यज्ञकर्ता व सृष्टिकर्ता ब्रम्हा एकच असेल.

ह्या सूक्तामध्ये एकूण चार ऋचा आहेत, म्हणजेच अथर्वमंत्र आहेत.

हे सूक्त पुढीलप्रमाणे:-

**इदं जनासो विदथ महद ब्रम्ह वदिष्यति |**
**न. तत् पृथिव्या नो दिवि येन प्राणान्ति वीरुधः||**

**अन्तरिक्ष आसां स्थाम श्रान्तसदामिव |**
**आस्थानमस्य भूतस्य विदुष्टद् वेधसो न वा||**

**यद् रोदसी रेजमाने भूमिश्च निरतक्षतम् |**
**आर्द्रं तद्दय सर्वदा समुद्रस्येव स्त्रोत्याः||**

**विश्वमन्यामभीवार तदन्यस्यामधिश्रितम् |**
**दिवे च विश्ववेद से पृथिव्यै चाकरं नमः||**

यातील प्रथम मंत्राचा असा अर्थ आहे की हे जिज्ञासू हो! आपण या ज्ञानाचे शोधन करा, ज्या ज्ञानामध्ये ब्रम्हाच्या अस्तित्वाची जाण असेल. हा ब्रम्ह फक्त द्युलोक अथवा धरतीवरच निवास करत नाही, तर सर्वत्र हे ब्रम्ह वास करते. ह्या ब्रम्हाकरवे-परब्रम्हाकारणे औषधी 'प्रारण' प्राप्त करतात.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे भक्तगणहो! मुमुक्षूहो! ज्ञानीजनहो! साधकहो! आपणही त्या परब्रम्हाचे, परमप्रकृती -परमात्म्याचे ज्ञान प्राप्त करावे, ज्याला ब्रम्हविद्या असे संबोधले जाते. हे परब्रम्ह व परमात्मा सर्वत्र वास करणारा असून, ह्याच परमप्रकृतीपासून-परमात्मापासून आपण सर्व प्राण, शक्ती, तेज, श्वास, धर्म आणि नीती प्राप्त करत असतो.

यातील दुसऱ्या मंत्राचा असा अर्थ आहे की ज्या औषधी परब्रम्हाकडून अथवा ब्रम्हाकडून 'प्राण' प्राप्त करतात, त्या औषधींचा निवास अंतरिक्षामध्ये आहे. याही परब्रम्हाचे अस्तित्वही अंतरिक्षामध्येही आहे व आपल्या सर्वांमध्येही. ज्याप्रमाणे थकलेले मनुष्य आपल्या गृही येऊन विश्राम करतात,

त्याप्रमाणे त्याच मनुष्याची सेवा करुन हया औषधी अंतरिक्षामध्ये निवास करतात. मात्र या अनंत स्थानाला विधाता, काळ, नियती आणि मनु जाणू शकत नाही. त्याकरिता ब्रम्हविद्येची आवश्यकता आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहता, आपले आत्मे (जे) परब्रमृहाकडून धर्म, नीती, प्राण, शक्ती, तेज आणि श्वास प्राप्त करतात, त्यांचे मूल स्थान अंतरिक्ष आहे. मात्र या अंतरिक्षाला स्वयं काळ व नियती जाणू शकत नाही. कारण या अनंत विवरांना जाणण्यासाठी दिव्य ज्ञान दृष्टीची आवश्यकता असते.

यातील तिसऱ्या मंत्राचा असा अर्थ आहे की हे दयावा पृथिवि अर्थात हे पृथ्वी आणि द्युलोक! आपण उभयंतांनी जे उत्पन्न केले आहे, ह्या भूदेवीने जे उत्पन्न केले आहे, ते सर्व प्रत्येक नित्य नवीन राहते म्हणजेच त्याचीही उत्पत्ती, नियंत्रण अथवा पोषण आणि नाश ह्या तीन गतीने चक्र सुरू राहते. ज्याप्रमाणे सरोवरांतून निघणारे जलस्त्रोत अक्षय रुपाने बाहेर पडतात. हेही जलस्त्रोत अक्षय असतात. कारण ते जलस्त्रोत

ओढा, नाला, कुंभजल, बाष्प, पर्जन्य व हिम अशी रुपे धारण करतात.

ह्या मंत्रामध्ये पुनर्चक्राची प्रक्रिया आहे, जी शाश्वत असूनही परिवर्तनशीलतेचे प्रतीक आहे. कारण हिंदू वैदिक तत्वज्ञानाचा मुख्य गाभाच आहे. परिवर्तन म्हणजे वारंवार होणारे बदल, पुनर्चक्र. जीवाचे अनेक जन्म असतात आणि मृत्यूही. हे तत्त्व आपल्याला अनेकत्वामध्ये एकत्व शिकवते. कारण जीवाचे अनेक जन्म असले, तरी त्याचा आत्मा एकच असतो. अनेक वस्त्रे असली, तरी धारण करणारे शरीर एकच असते. अनेक कंकणे असली, तरी त्यांना धारण करणारा हात एकच असतो.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे परमात्मा व परमप्रकृती! आपण उभयंतांनी जे जीव, वनस्पती, गंधर्व, यक्ष, किन्नर, अप्सरा, देवता, पितर, मनुष्य, पशु आदि उत्पन्न केले आहे, त्यांचे पुनर्चक्र कायम चालू राहते, त्यांच्या तिन्ही गती कायम सुरू राहतात, ज्याप्रमाणे पंचमहाभूतांच्या तीनही गती अक्षयरुपात चालू राहतात.

यातील चौथ्या मंत्राचा असा अर्थ आहे की हे अंतरिक्ष या जगताचे आवरण रुप आहे. धरतीच्या आश्रयाला राहणारे हे विश्व आकाशाकडे वृष्टिकरिता प्रार्थना करत आहे. या आकाशाला, या द्युलोकाला आणि विविध रत्नांना धारण करणाऱ्या वसुंधरेला, वैभव संपन्न पृथ्वीला आम्ही नमन करत आहोत.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे ब्रम्हांड या जगताचे आवरण आहे. पृथ्वी या महाभूताच्या आश्रयाने राहणारे हे विश्व आकाश या महाभूताकडे कृपावृष्टीची याचना करत आहे. या आकाशाला, या ब्रम्हांडाला, अंतरिक्ष आणि पृथ्वीला आमचा प्रणाम असो.

# स्वस्त्ययन सूक्त

हे सूक्त फक्त चंद्रमा व इंद्राणीच्या स्तुतीवरच आधारित नाही, तर शत्रूंचा पराजय, स्वतःचा व स्वतःच्या राजाचा विजय, शत्रूंचा नाश तसेच धनाचे वर्धन व संरक्षण याकरिता असलेल्या प्रार्थना यंत्रांवर ही आधारित आहे. या सूक्ताचे ऋषि अथर्व असून या सूक्ताची देवता चंद्रमा आणि इंद्राणी आहे. चंद्रमा हा परिवर्तनशील आणि गतीशील मानलेला असून तो संपत्ती आणि विजयाचे प्रतीक आहे. देवी इंद्राणी अथवा शची ही सुद्धा विजय, पराक्रम, संपत्ती व सौभाग्य प्रदान करणारी देवता आहे. ह्या सूक्तामध्ये चार मंत्र आहेत. याखेरीज या सूक्ताचे छंद अनुष्टुप आणि पथ्या पंक्ति आहे. मात्र या सूक्ताचे विशेष महत्त्व आहे, कारण हे सूक्त स्वस्तिवाचन, विवाहानंतरचा गृहप्रवेश आणि पुण्याहवाचन या विधींमध्ये म्हटले जाते. हे सूक्त प्रथम कांडातील २७ वेळ सूक्त आहे.

हे सूक्त पुढीलप्रमाणे:-

**अमू: पारे पृदाक्यस्त्रिषप्ता निर्जरायव:|**
**तासा जरायुभिर्व यमक्ष्याइवापि व्ययामस्यघायो परिपन्थिन:||**

**विषूच्येतु कृतन्ती पिनाकमिव बिभ्रती|**
**विष्वक् पुनर्भुवा मनोसमृध्दा: अघायव:||**

**न बहव: समशकन नार्भका अभि दाधृषु:|**
**चेणोरद्रा इवाभितोसमृध्दा अघावय:||**

**प्रेतं पादौ प्रस्फुरतं वहतं घृणतो ग्रहान्|**
**इन्द्राण्येतु प्रथमाजीतामुषिता पुर:||**

या चारही ऋचांमध्ये एक एक मंत्र समाहित आहे. जो शत्रूंचा नाश करतो आणि आपल्याला विजय देतो. ह्या तिन्ही सूक्तातील

मंत्राचा उपयोग तांत्रिक-मांत्रिक करतात, ते सत् कार्यासाठी असो वा दुष्कार्यासाठी.

यातील प्रथम मंत्राचा असा अर्थ आहे की जरायु म्हणजे एकमेकांना संलग्न असलेल्या चक्रव्यूह पार करुन बाहेर पडलेली ही त्रिसप्त म्हणजे ३७ अक्षौहिणी गतिशील सेना सर्पिणीप्रमाणे शक्तीशाली व प्रचंड विशाल आहे. त्यांनी निर्माण केलेला जरायु म्हणजे चक्रव्यूहाने आम्ही पापीजनांचे नेत्र वा दृष्टी हिरावून घ्यावी.

अध्यात्म दृष्टीने पाहता, मूलाधार चक्राला भेदून, (संकटे पार केलेल्या) जरायुज झालेल्या, स्वाधिष्ठान चक्राकडे प्रस्थान करणारी ही शक्तीधार आहे, ही चित्कला आहे, ही कुंडलिनी आहे, जिची अग्निप्रमाणे तीन मुखे असून सप्त जिव्हा आहेत. ती जागृत झाल्यानंतर आपल्या विचार व मनाभोवती असे सुरक्षित कवच निर्माण होते, की कुठलेही दुष्ट विचार ते कवच भेदू शकत नाही.

यातील दुसऱ्या मंत्राचा असा अर्थ आहे की रिपुंचा विनाश करण्यामध्ये सक्षम असणाऱ्या पिनाक म्हणजेच शिवधुनुप्रमाणे शस्त्रांना धारण करणारी व रिपुंचा संहार करणारी आमची सेना चतुर्दिशांनी पुढे व्हावी. जिच्या पुनः प्रकाशित व प्रज्वलित झाल्याकारणे व जिच्या तेजाकारणे, पुनः एकत्रित झालेल्या रिपु सेनेची हदये भयकंपित व्हावी आणि तिचे शासक परास्त होऊन निर्धन व्हावेत.

अध्यात्म दृष्टीने पाहता, आसुरी शक्ती व विपदांचा नाश करण्याऱ्यामध्ये सक्षम असणाऱ्या कुंडलांना धारण करणारी व कुविचारांचा संहार करणारी, प्राणधारा असलेली चित्शक्ती कुंडलिनी पुढच्या चक्राकडे वळावी. जिच्या तेजाकारणे आसुरी शक्तींना भय वाटावे आणि आपल्यावर (साधकांवर) प्रहार करु पाहणारे मांत्रिक -तांत्रिक, अहितचिंतक व अशुभ व्यक्ती परास्त होवोत.

यातील पाचव्या मंत्राचा असा अर्थ आहे की बृहत शत्रू म्हणजे आपल्यापेक्षा अधिक सशक्त व अधिक सशक्त असलेले

शत्रू आम्हाला जिंकू नये आणि आमच्यापेक्षा कमी सशक्त असलेले अथवा आमच्याप्रमाणे समबल असणारे शत्रू आमच्यासमोर क्षणार्धात परास्तच व्हावेत, ज्याप्रमाणे वेळूचे अंकुर एकटे तथा निर्बल असतात, त्याचप्रमाणे पापी मनुष्य धनविहीन व सामर्थ्यविहीन होवोत.

अध्यात्म दृष्टीने पाहता, आमच्यावर (साधकांवर) प्रहार करणारे मात्र आमच्यापेक्षा अधिक साधना असणारे मांत्रिक - तांत्रिकांनी केलेले प्रयोग विफल ठरावेत आणि आमच्यापेक्षा कमी अथवा समसाधना असणारे तांत्रिक -मांत्रिक आमच्या तेजापुढे परास्त व्हावेत, ज्याप्रमाणे पापांचा अंकुर निर्बल होतो, त्याचप्रमाणे हे अशुभ चिंतक निर्बल व्हावेत.

यातील चौथ्या मंत्राचा असा अर्थ आहे की, हे आमच्या पदकमलहो! तुम्ही उभयंता द्रुतगतीने म्हणजेच अतिवेगाने गमन करुन पुढे व्हावे तथा वाञ्छित फळ देणाऱ्या मनुष्याच्या घरापर्यंत आम्हांला पोहोचवा, आम्हांला उत्तम मार्गदर्शन करावे. कोणाद्वारेही विजित न झालेली, न लुटलेली अभिमानी इंद्राणी

म्हणजे सौभाग्यलक्षणी लक्ष्मी -धनसंपदा, विजय व पराक्रमलक्षणी सेना आम्हां सर्वांच्या पुढे पुढे आमचे संरक्षण करत चालावे.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे आमच्या पदकमलहो! तुम्ही उभयंता आम्हांला धर्मोचित आणि समयोचित आचरण करणाऱ्या मार्गावर चालण्यासाठी प्रवृत्त करावे. आम्हांला सज्जन व धर्माच्या रक्षणासाठी साधना करण्यासाठी प्रवृत्त करावे, कोणालाही विजित न झालेली अपराजिता असलेली इंद्राणी म्हणजे कुंडलिनी पुढच्याच चक्राकडे अग्रेसर व्हावी.

# शर्म प्राप्ती सूक्त (सुखप्राप्ती सूक्त)

शर्म म्हणजे (शर्मन) सुख, समृद्धता, विजय, प्रताप. हे सूक्त सुख, समृद्धता, विजय आणि शौर्य प्राप्त करण्यासाठी म्हटले जाते. हे सूक्त अर्थववेदातील प्रथम कांडातील २६ वे सूक्त आहे. ह्या सूक्ताचे ऋषि ब्रम्हा म्हणजे सृष्टिकर्ता व यज्ञकर्ता ब्रम्हा असून या सूक्ताच्या देवता इंद्र, इंद्राणी शची,भग, सविता म्हणजेच गायत्री, सूर्य, मरुदगण अशा सहा देवता आहेत. ह्या सूक्ताचे छंद गायत्री, एकावसाना त्रिपदा साम्नी त्रिष्टुप, एकावसाना पाद्निचृत गायत्री आहेत.

ह्या सूक्ताच्या ज्या देवता आहेत, त्यांच्याविषयी अधिक स्पष्टीकरण देऊ इच्छिते. या सूक्तामध्ये इंद्रदेवाला राजा किंवा सेनानायकाच्या रुपात पाहिले आहे, तर इंद्राणीला राजाची शक्ती, चेतना म्हणजेच सम्राज्ञी अथवा सैन्य शक्तीच्या स्वरुपात पाहिले आहे. इंद्राणीला 'शची' असेही म्हटले जाते. 'शची' चा अर्थ निघन्टु संहितेमध्ये वाणी, कर्माची उर्जा आणि प्रज्ञा असा दिला आहे. अध्यात्म दृष्टीने पाहता, शची ही जीवात्माची वाणी, विचार

व कर्माची शक्ती आहे, तर इंद्र हा जीवाचे विचार, वाणी आणि कर्म आहे. म्हणजे इंद्र जीवात्मा असून शची ही त्याची जीवन - चेतना आहे.

दुसरी देवता आहे भग. आपण परमेश्वराला 'भगवान'म्हणतो. कारण परमेश्वराच्या मस्तकावर व गुणांमध्ये भग व देवता विराजमान असते. भग म्हणजे धन, समृद्धता यांचे प्रतीक, किंबहुना भग हे एक विशेषण सुध्दा आहे, जे राजा, ब्राम्हण, सविता, वरुण, इंद्रि व अग्निकरिता ही संबोधित केले जाते. भग हा आदित्य गण आहे. याखेरीज भगाला सौभाग्य दायकही म्हटले जाते. कारण भग या शब्दापासूनच भाग्य हा शब्द निर्माण झाला आहे. अध्यात्म दृष्टीने पाहता,भग हा परमानंद व चित् आनंदाचे स्वरुप आहे.

त्यानंतर तिसरी देवता ती सविता. हे सूर्याचेच स्त्रीरुप मानले जाते. सविता म्हणज् सवितृ, गायत्री, जी ब्रम्हदेवाची प्रथम पत्नी आहे आणि आद्य देवता, जिचा मंत्र ओमकार -प्रणव आणि परब्रम्हाचे व्यक्त रुप आहे. गायत्री देवता आणि गायत्री मंत्र सनातन हिंदू धर्म आणि संस्कृतीचा मूलाधार आहे. सूर्य आणि

सवितृ देवी/गायत्री देवी साक्षात तेज, ज्ञान, प्रकाश, मेधा, पराक्रमाची देवता मानल्या जातात.

मरुदगण म्हणजे मरुताचे वायुदेव. मरुत म्हणजे वायु. वायु देव हे पंचमहाभूतातील एक महत्त्वाचे महातत्व आहे. वायुमुळेच आपण श्वास घेऊ शकतो म्हणूनच वायुदेवाला प्राणदेव म्हटले जाते. ह्या वायुचे गण म्हणजे अन्य कोणी नसून अन्य वायु आहेत, जे वातावरणात असतात. म्हणजेच ऋषिंना इतक्या शतक - सहस्त्राकांपूर्वीच ज्ञात होते की वातावरणात प्राणवायु, कर्बवायु असे अनेक वायु आहेत.

अध्यात्म दृष्टीने पाहता, मन वायुपेक्षा वेगवान असते, म्हणूनच मनाच्या १५ नाडया म्हणजेच मरुदगण आहेत.

हे सूक्त पुढीलप्रमाणे:-

***आरे इ सावस्मदस्तु हेतिर्देवासो असत्*** |
***आरे अश्मा यमस्यथ*** ||

***सखासावस्मभ्यमस्तु रातिः सखेन्द्रो भगः सविता चित्रराधाः*** ||

***यूयं न प्रवतो नपन्मरुतः सूर्यत्वचसः*** |
***शर्म यच्छाय सप्रथाः*** ||

***सुषूदत मृडत् मृडया नस्तनूभ्यो मयस्तोकेभ्यस्कृधि*** ||

यातील प्रथम मंत्राचा असा अर्थ पाहता, हे देवताहो ! रिपुंद्वारे आमची मंदिरे, भवन, प्रसाद, कोठार, शस्त्रागार व गोपुरांवर आक्रमण करण्यार्थ फेकली गेलेली व अस्त्रे, शस्त्रे व अभिमंत्रित पाषाण आम्हांला, आमच्या मंदिरांना, भवनांना, प्रासादांना,

कोठारांना, शस्त्रागार व गोपुरांना क्षति न पोहोचवावेत. आणि आमच्या संरक्षणाकरिता तुम्ही सर्वांनी रिपुंवर फेकलेली अस्त्रे व पाषाण (अभिमंत्रित) आम्हांला न क्षति पोहोचवावेत.

म्हणजेच सृष्टिकर्त्याला ज्ञात होते, की आपल्या म्हणजेच हिंदूच्या मंदिरावर, प्रासादावर, कोठारांवर आणि गृहांवर शस्त्र व पाषाणांचे प्रहार होणार आहेत, भविष्यात.

अन्य विचारधारा असलेल्या व्यक्ती आपल्यावर, आपल्या धर्मावर आणि संस्कृतीवर आक्रमण करणार आहेत. हे भविष्य सृष्टिकर्त्याला आणि ऋषिंना ज्ञात होते, वेदकाळात.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे अनंत शुभ शक्तीहो! आसुरी शक्ती, मांत्रिक -तांत्रिक, षडरिपु व आमचे मित्रगणांवर,सज्जनांवर केले गेलेले प्रहार व्यर्थ ठरोत व आपणा सर्वांचा अशुभ शक्तीवर केलेला प्रहार आम्हांला क्षति न पोहोचवावेत.

यातील दुसऱ्या मंत्राचा असा अर्थ आहे की दान देणाऱ्या व ऐश्वर्यसंपन्न असलेल्या सविता देवी तथा विचित्र धनाने म्हणजेच विभिन्न प्रकारच्या धनाने, संपत्तीने युक्त इंद्रदेव तथा भगदेव

आमचे मित्र होवोत,सखा होवोत आणि त्यांनी आम्हांस ऐश्वर्य, धनसंपत्ती आणि नाना प्रकारची सुखे प्रदान करावीत.

अध्यात्म दृष्टीने पाहता, अनंत सुखाचे प्रतिदान करणारे परमात्मा, परमप्रकृती, चित्शक्ती, कुंडलिनी, वाणी, चेतना शक्ती, कर्मशक्ती, आमच्या कर्म, साधना, यज्ञ व जीवनामध्ये सखा होऊन आम्हांला तरुन न्यावे.

यातील तिसऱ्या मंत्राचा असा अर्थ आहे की स्वतःची सुरक्षा करणारे व आमचे सरंक्षण करणारे, कधीही स्वयं अध:पतित व होणारे व आम्हांलाही कधीही अध:पतित न होऊ देणारे, सूर्यासारखे तेजस्वी असणारे मरुतगणहो ! आपण सर्वांनी आम्हांस सुख प्रदान करावे.

अध्यात्म दृष्टीने पाहता, स्वतःची सुरक्षा करुन आमच्या कर्माचे सरंक्षण करणारे, स्वतःला अंध:पतित न होऊ देता, आमचे उत्थान करणाऱ्या विवेकी मनाच्या नाड्या अथवा कलाहो ! आम्हांला सदैव सत्कर्म करण्यास प्रवृत्त करावे.

यातील चौथ्या मंत्राचा असा अर्थ आहे की, इंद्र-इंद्राणी, शची, गायत्री, सविता, भग, सूर्य, मरुतगण व अग्नि आदि देवतांनी आम्हांला स्वतःच्या हदयात आश्रय द्यावा आणि आम्हांला हर्षित करावे. त्यांनी आमच्या शरीरांना आरोग्य प्रदान करावे तथा आमच्या कन्या-पुत्रांना आनंदित व प्रसन्न ठेवावे.

अध्यात्म दृष्टीने पाहता, परमात्मा, परमप्रकृती, चिदानंददायिनी, कुंडलिनी, वाणी, चेतना शक्ती, आत्मा आणि कर्मशक्ती आदिंनी आम्हांला सदैव मार्गदर्शन करावे आणि आम्हांला प्रत्येक पथावर हर्षित ठेवावे. त्यांनी आमच्या मनाच्या नाड्या व शरीराच्या गति स्थिर ठेवाव्यात तथा आमच्या मित्रांना व सज्जनांना सुख प्रदान करावे.

# विद्युत सूक्त

हे सूक्त स्त्री, कन्या, अशनि म्हणजे उल्का, पर्जन्यदेव, मेघ आणि विद्युत म्हणजेच विजेला समर्पित आहे. अशनिला पर्यायवाची शब्द विद्युत असाही आहे. हे सूक्त प्रार्थना रुपात आहे. हे सूक्त प्रथम कांडातील १३ वे सूक्त आहे. ह्याही सूक्ताची देवता विद्युत, पर्जन्यदेव,अशनि, कन्या व स्त्री आहे. ह्या सूक्तामध्ये चार मंत्र आहेत. ह्या सूक्ताचे छंद अनुष्टुप, चतुष्पाद, विराट जगती, त्रिष्टुप परा बृहर्तगर्भा पंक्ति आहेत. या सूक्ताचे ऋषि भृगू आणि अंगिरा आहेत. या सूक्ताची देवता पाहता, विद्युत म्हणजे वीज, जिला ब्रम्ही म्हटले जाते. याखेरीज विद्युल्लता, चपला, चंचला, तडित आणि सौदामिनी हीदेखील विशेषण आहेत.

स्त्री व कन्यादेखील कार्यांमध्ये कुशल असल्यामुळे त्यांनाही चपला, त्या दोघी (उभयंता) लक्ष्मीस्वरुप असल्याकारणे आणि स्वाभिमानी असल्यामुळे चंचला, तडित आणि शक्तीस्वरुप असल्यामुळे सौदामिनी असे संबोधले जाते. एकूणच विद्युतचे गुण स्त्रीमध्ये -कन्येमध्ये असतात. चापल्य,

मातृत्व, उर्जा देणे, एकदम कोसळणे आणि मेघांचे (दुष्टांचे) दमन करणे असे गुणधर्म विजेचे असतात.

पर्जन्य देव ज्याला पितर अथवा पित्याचीही संज्ञा दिली जाते. पर्जन्य चक्राचे संपूर्ण ज्ञान या सूक्तात आढळते व पर्ज्यनाचे महत्त्वही. पर्जन्यदेव हा पर्जन्याचा देव असून तो इंद्राच्या व अग्निच्या आधीन आहे. पर्जन्यदेव हा पितर व पर्ज्यनाची देवता असून इंद्र हा वज्र व विद्युत, विजय व पराक्रमाची देवता आहे.

मेघ व अशनिचे स्पष्टीकरण

अशनि म्हणजे उल्का अथवा विद्युत, ज्याला निसर्गाचे वरदान व प्रकृतीचा अभिशाप उभयरुपातही पाहता येईल. यदि विद्युत आहे, तरच आपला गृहात, विद्युत उपकरणांमध्ये विद्युतेचा व उर्जेचा संचार होतो. त्याकारणेच आपण उपकरणांच्या माध्यमाने स्वतःचे मनोरंजन करु शकतो, वस्त्रे धुवू शकतो, प्रकाश प्राप्त करु शकतो आणि अन्न शिजवू शकतो. यदि विद्युत आपल्या अंगावर, वृक्षांवर अथवा कोणत्याही उपकरणांवर कोसळली तर जिवित हानी, निसर्ग हानी व वित्त हानी होऊ शकते. त्याप्रमाणे उल्केकारणे अंतरीक्षातील संतुलन व तोल उत्तम राहतो. किंतु

उल्का कोसळणे, हा शुभ संकेत असला तरी ती ज्या स्थानी कोसळते, त्या स्थानी कृषी फलित होऊ शकत नाही अथवा भवन बांधता येत नाही, म्हणून तिची प्रार्थना करुन धरती मातेची रक्षण करण्याची आवश्यकता आहे.

मेघ हीसुद्धा एक देवता आहे. मेघांचू संवर्तक, ऐन्द्र, आवर्त व अनाघात हे चार प्रकार आहेत. मेघ ही इन्द्र व पर्जन्याच्या आधीन असतात. मेघांना इन्द्राचे सैन्य तसेच पर्जन्याचे सेनापती अथवा पुत्र म्हटले जाते. मेघ हीसुद्धा पर्जन्य, अग्नि, पृथ्वी, तेज, जल आणि वायुप्रमाणे प्राकृतिक शक्ती असते.

वेदकालापासून निसर्गातील घटकांना देवता स्वरुपात प्रस्थापित करुन त्यांची पूजन करण्याची परंपरा चालत आलेली आहे. निसर्ग म्हणजे प्रकृती, संस्कृती म्हणजे पुरुष अथवा आत्मा. अशी आहे आपली वैदिक संस्कृती, जी निसर्गातूनच म्हणजे प्रकृतितूनच निर्माण झाली.

ह्या सूक्तामध्ये चार मंत्र आहेत.

हे सूक्त पुढीलप्रमाणे:-

***नमस्ते अस्तु विद्युते नमस्ते स्तनयित्नवे |***

***नमस्ते नमस्तेश्मने येना दूढाशे अस्यसि ||***

***नमस्ते प्रवतो नपाद् यतस्तप: समूहसि |***

***मृडया नूस्तनूभ्यो मयस्तोकेभ्यकृधि ||***

***प्रवतो नपान्नम् एवास्तु तुभ्यं नमस्ते हेतये तपुषे च कृण्म: |***

***विद्म ते धाम परम गुहा यत् समुद्रे  अन्तर्निहितसि नाभि: ||***

***यां त्वा देवा असृजन्त विरवं इषुं कृण्वाना असनाय धृष्णुम्***

|

***सा नो मूड विद्यथे गुणाना तस्यै ते नमो नम: ||***

यातील पहिल्या मंत्राचा असा अर्थ आहे की हे विद्युतदेवी! आमचा तुला प्रणाम असो. गडगडाट करणाऱ्या व शब्द गर्जना करणाऱ्या मेघ तथा अशनिला आमची प्रार्थना पोहोचावी.

व्यापणाऱ्या मेघांना (आकाश) आम्ही नमस्कार करत आहोत. हे विद्युत देवी! हे तडिते! हे चपले! आपण इंद्राप्रमाणे दुष्ट व असुर लोकांना वज्र फेकून त्यांना दूर पाताळात न्यावे.

आध्यामिक दृष्टीने पाहता, हे तेज देवते! आम्ही तुला प्रणाम करत आहोत. है सत्रावी शत शत शत प्रणाम असो! अनंत गर्जना व शब्द ध्वनीचा अनुभव देणाऱ्या नादशक्ती आणि अंतरकर्णावर्तांना आमची प्रार्थना पोहोचावी. सर्वत्र व्याप्त असणाऱ्या पंचमहाभूतांच्या चरणी आमचा नमस्कार असो. हे सत्रावी! आपण आमच्या ब्रम्हरंधामध्ये येऊ पाहणाऱ्या आसुरी व दुष्ट शक्ती, विचारांवर प्रहार करुन त्यांना रोखावे.

यातील दुसऱ्या मंत्राचा असा अर्थ आहे की हे देवा! हे पर्जन्या! तुम्ही समुद्रातील अथवा कोणत्याही जलस्त्रोतातून जलास स्वतःच्या आत ग्रहण करता आणि असमय ते जल मेघांद्वारे बरसू देत नाही. अतिवृष्टी, पर्जन्यहिनता अशा समस्या निर्माण होऊ देत नाहीत.

आम्ही तुला प्रणाम करतो, कारण आपण आमच्या अंतरंगात तप एकत्रित करतात, आपण आमच्या देहांना सुख प्रदान करावे आणि आमच्या कन्या-पुत्रांना समृद्धता प्रदान करावी.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे परमेश्वरा! हे परमप्रकृती! तुम्ही उभयंता आमच्या तना-मनातून अनोपयुक्त, अयुक्त विचार व शक्ती, पातके ग्रहण करता व असमय ते सर्व प्रदान करत नाही.आम्ही तुम्हाला नमस्कार करतो, कारण तुम्ही आमच्या अंतरंगात तेज, तप, यज्ञ, साधना, प्रज्ञा व बल एकत्रित करता. आपण आमच्या प्रियजन सज्जनांना सुख प्रदान करावे.

यातील तिसऱ्या मंत्राचा असा अर्थ आहे की हे उंचावरुन न पडणाऱ्या (असमय) पर्जन्यदेवा! आम्ही तुला नमस्कार करत आहोत. आपले आयुध तथा तेजस म्हणजे तेज अथवा तेजोदेवतेला आमचा प्रणाम असो. आपण ज्यांच्या हृदयरुपी गुहेमध्ये वास करतात, त्याविषयी आम्हांला ज्ञान आहे. आपण समुद्रामध्ये नाभि रुपात विद्यमान असता.

या मंत्रावरुन कळते की वेदकालाचे विज्ञान आजच्या विज्ञानापेक्षा सहस्त्रपटीने सर्वश्रेष्ठ व महाप्रगत होते. पर्जन्यचक्र आणि पर्जन्याचे कारण असलेले मेघ ज्यांची उत्पत्ती समुद्रातील जलाकारणेच होते हे या दोन्ही मंत्रातून समजते.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे अध:पतित न होणाऱ्या व आम्हांलाही कधीही अध: पतित होऊ न देणाऱ्या आत्मा! अन्नरुप व सोममयी मना! तुमच्या तेजाला आणि धैर्य रुपी आयुधाला आमचा प्रणाम असो. तू सोममयी मनाच्या सूक्ष्मातिसूक्ष्म गर्भात नाभिप्रमाणे वास करतोस, हे मना! तू पंचतत्त्वमयी शरीराच्या सूक्ष्मातिसूक्ष्म भागात वास करतोस.

या मंत्रामध्ये ब्रम्हविद्येचे अथवा मनाला -आत्माला जाणण्याचे अस्तित्व आहे, असेच जाणवते. उपनिषदांमध्ये आणि महाभारत -भगवदगीतेमध्ये ज्या ब्रम्हविद्येचा उल्लेख मोठ्या प्रमाणात आढळतो, त्या ब्रम्हविद्येचे अथवा आत्मज्ञानाचे बीज, मूळ वेदांमध्ये आहे. खरं तर सर्व आगम, कोश, दर्शन, रामायण, महाभारत, असंख्य गीता, भगवद्गीता, गीता आदि सर्वांचा मूलाधार वेदच आहे.

यातील चौथ्या मंत्राचा असा अर्थ आहे की हे अशनि! हे विद्युत! रिपुंवर प्रहार करण्यासाठी इंद्राग्निसम समस्त देवतांनी शक्तीशाली व बलशाली वज्रबाणाच्या स्वरुपात आपली योजना व संरचना केली आहे. अंतरीक्षाच्या गर्जना करणाऱ्या हे अशनिदेवी! आम्ही तुला प्रणाम करतो आहोत. तू आमचे भय दूर करावेसे व आम्हास हर्ष प्रदान करावा.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे तेजोदेवते! परमप्रकृती! तुझी सरंचना पृथ्वीवरील सर्व दुष्ट व आसुरी शक्ती व स्यंदनावर प्रहार करण्यासाठी केली आहे. सर्वत्र नाद करणारी हे तेजोदेवते! तू आमचे भय व अज्ञान दूर करुन आम्हाला ज्ञान, उर्जा व बल प्रदान करावे.

# नारी सुखप्रसूति सूक्त

हे सूक्त अत्यंत वैज्ञानिक स्वरुपाचे आहे. जसा वेदमंत्रामध्ये मानव, शुक्राणू व रज:कण अथवा गर्भपेशी विवेचनाच्या प्रक्रियेचा उल्लेख होतो, तसेच या सूक्तातही स्त्रीची प्रसूति कशी करावी (निर्दोषतेने आणि शिशुला हानी न पोहोचता) याचे विवेचन आढळते. हे सूक्त प्रार्थना स्वरुपात आहे. ह्या सूक्तामध्ये स्त्रीचे गर्भाशय, गर्भमार्ग, जेरी म्हणजे स्त्री रज:स्वला झाल्यामुळे गर्भाशयामध्ये निर्माण होणारा रजोमंचक अथवा थैली, योनि आणि नाडी आदिचे वर्णनही आहे. हे सूक्त ऋषि अथर्वाचे असून ह्या सूक्ताची देवता पूषा, अर्यमा, दिक्पाल, वेषा आहेत. ह्या सूक्ताचे छंद पंक्ति, अनुष्टुप, चतुष्पाद, उष्णिवगर्भा, कुकुम्मती अनुष्टुप व पथ्यापंक्ति आहे.

हे सूक्त प्रथम कांडातील ११वे सूक्त आहे. हया सूक्तात सहा मंत्र आहेत.

पूषा ही प्रथम देवता असून १२ आदित्य गणांतील पाचवी देवता आहे. समस्त प्रकारच्या धान्यांमध्ये ह्या देवतेच निवास असतो. याखेरीज ही देवता गाईचीही देवता असून धान्य भंडाराची संरक्षिका असते. ह्या देवतेचा वास उजव्या कानाच्या एका नाडीमध्ये सुध्दा असतो. याशिवाय ही देवता तीर्थयात्रेकरु, पशु, पक्षी व धनाचे रक्षण करत असते.

ही देवता आपल्याला दुष्विचार व कुकर्मापासून, शत्रू व दुर्घटनापासून  दूर ठेवते. ही देवता स्त्री व पुरुष रुपातही जाणली जाते. जसे की स्त्री रुपात पूषा, पुरुष रुपात पूषण.

अर्यमा ही पितरांची देवता असून रात्रिचक्राची नियंता आहे. याखेरीज १२ आदित्यगणांतील तिसरा गणही देवता आहे. अर्यमेला आर्यांची मुख्य देवता अथवा आदित्यगणही म्हटले जाते. कारण 'अर्यमा' या शब्दापासूनच आर्य हा शब्द निर्माण झाला आहे. '

आर्य या शब्दाचा अर्थ ईश्वर, एकसत् कडे जाणाऱ्या पंथाचा दिव्य यात्री, सत्यव्रताचा पूजक अथवा पुरोहित, दिप्तीमान करणारा महान योध्दा, भद्रपुरुष, भद्र व्यक्ती.

संपूर्ण जंबुद्वीपावरील व्यक्ती म्हणजे आशियाखंडातील प्रत्येक व्यक्ती भारतवर्षाचा नागरिक असून आर्य आहे.

धूर्त जर्मनी आणि स्वार्थी युरोपियनांनी स्वतःला आर्य म्हणवून घेत असा कुचक्रविरचित सिंध्दात प्रदान केला की युरोप, उत्तर जर्मनीतून प्रगत व विज्ञानी वृत्तीचे आर्यन भारतात आले, त्यांनी हडप्पा संस्कृतीवर आक्रमण केले, जी भारताची मूळ संस्कृती होती. त्यानंतर त्यांनी अत्यंत विकसित आणि प्रगत संस्कृत भाषा विकसित केली व वेदग्रंथ निर्माण केले. म्हणजे वेदरचियता आर्यांनी भारताची मूळ संस्कृती नष्ट केली.

स्वतःची कुठलीही संस्कृती नसणाऱ्या व स्वतःचा इतिहास आणि गौरव नसणाऱ्या 'अनार्य' युरोपियांनी भारतामध्ये वेद, वेद आणि वैदिक संस्कृतीचे निर्माते आर्यांविषयी एकूणच हिंदू धर्म आणि सनातनी संस्कृती विषयी द्वेष निर्माण करण्याचा प्रयत्न केला व काही अंशी हा प्रयत्न यशस्वी ठरलाही. आजचे लेखक,

शिक्षक, विद्यार्थी, विद्यापीठाचे प्राचार्य, विचारवंत (अविचारी) व तत्त्वहीन तत्त्वचिंतक ह्याच कुंठित मतीकृत, दृष्टनिर्मित सिद्धांताला सत्य मानून प्रचार -प्रसार करत आहेत. 'समोर भारतीय पुरातत्त्व शास्त्राची वैदिक संस्कृती हीदेखील भारताची आद्य संस्कृती आहे' अशी प्रामाण्ये असूनही आणि हडप्पा संस्कृतीच्या काळातही लिंगपूजन आणि अग्निपूजेची बीजे आढळत असूनही. लिंग म्हणजे प्रतीकपूजन व अग्निपूजा (होम) हे वैदिक संस्कृतीचे आद्यघटक आहेत.

मी युरोपियनांच्या अशा दुष्कर्माचे कारण सांगते, सर्व प्रथम जर्मन लोक संस्कृत भाषेचा अभ्यास करत होते. त्यामुळे औत्सुक्य वाटून इंग्रजांनी ज्यावेळी संस्कृतचा अभ्यास केला, त्यावेळी त्यांना असे आढळले की संस्कृतपासूनच फ्रेंच, इंग्रजी, स्पॅनिश, जर्मन अशा परदेशी भाषा आणि मराठी, हिंदी, तेलगु, कन्नड, बंगाली, मागधी अशा प्रादेशिक भाषा निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे त्यांना भय वाटले की जर संस्कृत भाषेचे महत्त्व सर्व देशांत पसरले तर आपली इंग्रजी भाषा तुच्छ राहील. म्हणूनच

त्या दुष्टबुध्दी लोकांनी असा मूढतापूर्ण सिध्दांत मांडला की इंग्रजी, फ्रेंच, स्पॅनिश आणि जर्मन या भाषांपासून संस्कृत निर्माण झाली.

दुसरे कारण असे होते, युरोपियनांचा हेतूच धर्मप्रसार आणि साम्राज्य विस्तार होता. त्यामुळे 'फोडा आणि राज्य करा' ही त्यांची राजनीती होती. म्हणूनच त्यांनी या कार्यासाठी भारतीयांना त्या्ची मूळ भाषा, धर्म, संस्कृती या राष्ट्रीयतापासून दूर नेण्याकरिता आर्य आक्रमण सिध्दांत मांडला.

जे व्यापार, धन, समृद्धता, शिक्षण, भाषा स्वतःच्या विकासाकरिता आपल्या भारतावर आश्रित होते, ते आपल्याला परतंत्र करुन गेले, बौध्दिक आणि मानसिक दृष्ट्या.

असो, विषयांतर झाले!

मी अर्यमा या देवताविषयी स्पष्टीकरण पुनश्च करते. भगवद्गीतेत कृष्ण अर्जुनास कथित करतो की मी ऋषिंमध्ये भृगू, तर पितरांमध्ये अर्यमा आहे. ही देवता देखील स्त्री -पुरुषरुपात जाणली जाते. उदा. ज्योतिषशास्त्रात स्त्री देवता अर्यमा व पितरांमध्ये पुरुष देवता अर्यमान ही देवता नेत्रदृष्टीचीही प्रदायिनी मानली जाते.

अध्यात्म दृष्टीने पाहता, अर्यमा ही आर्यत्त्वाची म्हणजे आत्माची देवता आहे.

तृतीय देवता ही दिक्पाल आहे. दिक्पाल अथवा दिग्पाल ही देवता अष्टही दिशांची म्हणजे पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण, आग्नेय, वायव्य, ईशान्य आणि नैऋत्य या दिशांची मानली जाते.अष्ट दिशा असल्याकारणे दिक्पालदेखील आठ असतात. त्यातील कुबेर देव हा अत्यंत महत्त्वाचा आणि जनस्तुत्य देवता आहे. कुबेर हा विश्रवा ऋषीचा पुत्र असून त्यालाही देवत्वाचे स्थान प्राप्त आहे. याखेरीज कुबेर हा यक्षांचा आणि धनभांडारांचा स्वामी मानला जातो. त्याला 'लोकपाल' असेही म्हटले जाते. याशिवाय पूर्वेचा दिक्पाल इंद्र, तर आग्नेयाचा स्वामी अग्नीदेव, वायव्येचा दिक्पाल मरुत, उत्तरेचा लोकपाल कुबेर, पश्चिमेचा देव वरुण, ईशान्येचा स्वामी ईश, उर्ध्व दिशेचा अधिपति ब्रम्हा आणि अधो दिशेचा भूपती अनंत आहे.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे अष्टवसुचे प्रतिक आहे व अष्टप्रहाराचेही प्रतीक आहे.

चतुर्थ देवता आहे ती वेषा. ही कदाचित नारीची प्रसुती, गर्भाधान, गर्भधारणा, अर्भकरक्षण, जेरीपतन व सुखाची देवता ही वेष असावी अथवा अनंत रूपांची वा वेषांची देवता असावी. जर आपण ‘वेषा’ या शब्दाचा विग्रह पाहुया. व: आणि एषा म्हणजे राहु. ‘व' ही स्वामिनी = राहुची स्वामिनी असा होतो. म्हणजे ही कदाचित ग्रहणाची देवता असावी.

या सूक्तात ६ मंत्र आहेत.

हे सूक्त पुढीलप्रमाणे:-

*वषट् ते पूषन्नस्मिन्सूतावार्यमा होता कृणोतु वेधा: |*

*सिस्रतां नार्यत प्रजाता वि पर्णाणि निहतां सूतवा उ ||*

*चतस्त्रो दिव: प्रदिशाश्चतस्त्रो भूम्या उत |*

*देवा गर्भं समैरयन् तं व्यूर्णवन्तु सूतवे ||*

*सूषा व्यूणोंतु वि योनिं हापयामसि |*

*श्रथया सूषणे त्वमव त्वं बिष्कले सृज ||*

*नेव मांसे पीवसि नेव मज्जस्वाहत् |*

*अवैतु पृश्निं शेवलं शुने जराय्वतावेव जरायु पद्यताम् ||*

*वि ते भिनद्मि मेहनं वि योनिं वि गवीनिके |*

*वि मातरं च पुत्रं च वि कुमारं जरत्युणाव जरायु पद्यताम् ||*

*यथा वातो यथा मनो पतन्ति पक्षिण: |*

*एवा त्वं दशमास्य साकं जरायुणा पताव जरायु पद्यताम् ||*

यातील पहिल्या मंत्राचा अर्थ असा आहे की, हे अखिल विश्वाच्या पोषका व श्रेष्ठ जनांच्या हित्तैषी पूषा देवता! हे आर्यांची देवता! पितरांचा स्वामी अर्यमा देवता! आम्ही तुम्हाला आहुती - हवि समर्पित करतो आहोत. आपण प्रसुता स्त्री आणि वैद्य - परिचारिकांची सहायता करा. ह्या स्त्रीला, जी प्रसुता आहे, तिला प्रसुतीसाठी धैर्य प्रदान करा, हे वैद्यहो! परिचारिका तिला सावधानपूर्वकतेने आपल्या अंगांना तयार करायला सांगा, तिला स्वतःचे अंग सैल करायला सांगा.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता,हे अखिल विश्वाच्या पोषणकर्ता व सज्जनांच्याही हितैषी असलेल्या परमप्रकृती आणि परमात्मा! आम्ही तुम्हाला समर्पित आहोत. आपण बुध्दी आणि मनाची सहायता करा. (कारण बुध्दी विचार व ज्ञानाला जन्म देते, तर तिला सहाय्य मन करते) हे सिध्दहो! गुरुहो! तुम्ही बुध्दीला ज्ञान प्रसुतीसाठी साहाय्यता करा, तिला असीम व मनमुक्त होऊ द्या.

यातील दुसऱ्या मंत्राचा असा अर्थ आहे की द्युलोक आणि भूमीला चार दिशांनी व चार दिवनी म्हणजे अन्य चार दिशांनी घेरले आहे, त्याप्रमाणे दिव्य पंचमहाभूतांनी म्हणजे अग्नी, तेज, वायु, आप, आकाश आणि पृथ्वीने या गर्भाला घेरले आहे म्हणजेच धारण केले आहे. त्या महाभूतांनीच या आवरणातून गर्भाला म्हणजे शिशुला बाहेर काढावे व मुक्त करावे.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, पिंड व ब्रम्हांडाला अनेक आत्म्यांनी व तत्वांनी घेरले आहे. या जीवाला मुक्त करावे हीच प्रार्थना परमात्माचरणी आहे.

यातील तिसऱ्या मंत्राचा असा अर्थ आहे की हे प्रसवशील माता म्हणजेच प्रसुता स्त्री अथवा प्रसव सहाय्यक देव! आपण गर्भाला अथवा शिशुला मुक्त करावे. आम्ही वैद्य व परिचारिका ह्या प्रसुता स्त्रीच्या गर्भमार्गाला फैलावत आहोत, तिने तिच्या अंगाला काहीसे सैल करावे आणि गर्भाला बाहेर येऊ देण्यास प्रेरित करावे.

ह्या मंत्रातून अत्यंत वैज्ञानिक व उपयुक्त विवरण प्राप्त होते, ते म्हणजे गर्भमार्ग म्हणजेच योनीमार्गाची ग्रीवा फैलावण्याची पध्दती. शिशु योनीमार्गाच्या ग्रीवापेक्षा मोठा असल्याकारणे त्याला बाहेर काढण्यासाठी गर्भमार्गाला फैलावणे आवश्यक असते, असे स्पष्टीकरण या मंत्रातून मिळते.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे मेधे अथवा हे सरस्वती देवी! आपण विचार, प्रतिभा यांना अनेक बंधनातून मुक्त करावे. आम्ही सिध्द व गुरु, या साधक व शिष्यांच्या बुध्दीमार्गाला व विचार मार्गाला उत्तुंग करत आहोत. साधकांनी आम्हांस समर्पित व्हावे आणि नवविचार-नवप्रतिभांना बाहेर येऊ द्यावे.

यातील चौथ्या मंत्राचा असा अर्थ आहे की गर्भस्थ शिशुला आवेष्टित करणारी पिशवी म्हणजे ‘जेरी’ ही ‘जरायू’ प्रसूता आणि शिशुकरिता मांस, मज्जा आणि मेद आदिप्रमाणे उपयोगी नव्हे, तर आत राहून अथवा शिशुच्या अंगावर लपेटून राहून गंभीर दुष्परिणाम निर्माण करणारी सिध्द होते. शैवाल म्हणजे शेवाळेप्रमाणे नरम आणि हानीकारक असणारी जेरी पूर्णपणे बाहेर

यावी आणि पशुंचा आहार बनावी. ह्या जेरीपासून कुणालाही हानी पोहोचू नये.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, बुध्दीला व मनाला आच्छादित करणारी व गंज चढवणारी ही बंधने व आवरणे संपोषकांप्रमाणे उपयुक्त नसून बुध्दी व मनाचा विकास तसेच साधकांची प्रगतीला बाधक ठरणारी आहेत. म्हणून ही बंधने हटली जाऊन त्या बंधनांनी अशुभ शक्तींना बांधले जावे.

या मंत्रातूनही जेरी म्हणजे शिशुला आवेष्टित करणाऱ्या पिशवीचे वैज्ञानिक वर्णन आहे, हे सांगायला नकोच.

यातील पाचव्या मंत्राचा असा अर्थ आहे की हे प्रसूता! स्त्री! मी वैद्य, तुझ्या निर्विघ्न प्रसूती अथवा प्रसवाकरिता तुझा गर्भमार्ग, योनी आणि नाड्यांना विशिष्ट प्रकारने उघडत अथवा खोलत आहे. माता व बालकाला नाळेपासून विभक्त करत आहे. त्यामुळे ही जेरी पूर्णपणे बाहेर येऊन पृथ्वीवर पडेल म्हणजेच जमिनीवर पडेल.

या मंत्रातून प्रसूतीक्रियेचे संज्ञापन प्राप्त होते. शिशु बाहेर पडण्यासाठी नाळेला विभक्त करणे व शिशु बाहेर आल्यानंतर त्याच्या अंगावरची जेरी काढून टाकणे अशी प्रक्रिया  दिसून येते.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे बुध्दीमते! मी गुरु, तुझ्यातून उत्तम व निष्कलंक प्रतिभा उत्पन्न व्हावी याकरिता मन, व आणि नाड्यांना अनेक बंधनातून मुक्त करत आहे. बुध्दी व प्रतिभा यांना स्वतंत्र स्थान देत आहे. बुध्दीवरची व मनावरची बंधने हटवत आहे. त्यामुळे ही बंधने निरसून जातील.

यातील सहाव्या मंत्राचा असा अर्थ आहे की ज्याप्रमाणे वायु वेगपूर्वक प्रवाहित होतो, पक्षी ज्या वेगाने आकाशात उडतात याशिवाय मन ज्या तीव्र गतीने अनेक व असंख्य विषयांमध्ये रत होते, त्याचप्रमाणे दहाव्या मासापर्यंत गर्भस्थ शिशुही जेरीसहित गर्भातून मुक्त होऊन बाहेर यावा.

ज्याअर्थाने ह्या मंत्रामध्ये दहाव्या मासामध्ये प्रसूती करण्याची बाब सांगितली गेली आहे, त्याअर्थी त्या काळात उशीराच प्रसूती करायची पध्दती असेल, जेणेकरून प्रसूती निर्विघ्न होवो आणि

मातेला अधिक प्रसवपीडा होऊ नये तसेच गर्भस्थ असलेल्या शिशुची पूर्ण वाढ झालेली असावी.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, ज्याप्रमाणे वायुचा वेग व प्रवाह संतुलित असतो, पक्षाच्या दोन्ही पंखांचा वेग समान असतो, याशिवाय मनाचे समान रुप आणि वेगाने रममाण होणे असते (अनेक विषयांमध्ये) त्याचप्रमाणे बुध्दीच्या दशम स्थानात असलेल्या प्रतिभा आणि विचार बंधंनाना त्यागत/तोडत बाहेर पडावेत.

# सुरक्षा सूक्त

हे सूक्त अथर्ववेदातील द्वितीय कांडातील सोळावे सूक्त आहे. हे सूक्त एका प्रकारे यजुषाप्रमाणे आहे आणि प्रार्थनेप्रमाणे देखील. हे सुक्त यज्ञांमध्ये आहुती देणाऱ्या मंत्रामध्ये रचले गेले आहे. या शब्दाचा ऋषी सृष्टी कर्ता आणि यज्ञकर्ता ब्रम्हा असून या सुक्ताच्या देवता दयावा पृथिवि म्हणजे स्वर्ग व पृथ्वी,अग्नी, विश्वंभर, सूर्य, प्राणअपान वायू आहेत. या शब्दाचे छंद एक पदासुरी त्रिष्टुप , एक पदासुरी उष्णिक, द्विपदासुरी गायत्री आहेत. या सूक्तामध्ये पाच मंत्र आहेत.

प्रथम दोन देवता दयावा पृथिवी म्हणजे स्वर्ग, आणि पृथ्वी, द्युलोकही भूलोक हयादेखील देवता आहेत. कारण पृथिवीला आपण धरणीमाता म्हणतो आणि भूदेवी म्हणूनही पूजन करतो. याखेरीज द्युलोक म्हणजे स्वर्गाची स्वामिनी असलेली स्वर्गलक्ष्मी अर्थात श्री या देवतेचे स्थान उच्च व वंदनीय आहे. भूदेवी आणि श्रीलक्ष्मी ह्या विष्णुच्या भार्या असल्याचे म्हटले

जाते. भूदेवी म्हणजे धरतीचे प्रतिक, तर श्रीलक्ष्मी म्हणजे स्वर्गाचे प्रतिक आहे.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता भूदेवी हे शरीराचे व स्थूलत्वाचे प्रतिक, तर विष्णु हे आत्मा व श्रीलक्ष्मी हे मनाचे प्रतिक आहे व सूक्ष्मत्वाचे.

द्वितीय देवता

अग्नि ही देवता भारतीय वैदिक संस्कृतीत अत्यंत महत्त्वाची देवता आहे. अग्नि हे फक्त पंचमहाभूतातील एक महातत्त्व नव्हे तर शरीरातील मूलभूत तत्त्व व संपोषकही आहे. अग्नि हा प्रत्येक ब्रम्हचारी, बालक, द्विज आणि ब्राम्हणांचा प्रथम गुरु असतो. अग्निला ज्याप्रमाणे देवत्वाचे स्थान प्राप्त आहे, त्याप्रमाणेच ऋषित्वाचा दर्जाही, वायु प्रमाणेच. आपण ऋग्वेदाचे प्रथम सूक्त पाहता, तेही अग्निचे सूक्त आहे. याचाच अर्थ वेदांची व वैदिक मंत्राची प्रमुख देवता अग्निच आहे. अग्निला यज्ञदेव अथवा यज्ञपुरुष असे म्हणतात. आपली संस्कृती आणि धर्म या व्यवस्थेसारख्या पवित्र व्यवस्थेवरच आधारित आहे. याशिवाय अग्निदेवाला ‘वैश्वानर’ ‘जातवेद’ ‘अग्निनारायण’ आणि देवमुख

असेही संबोधले जाते. वैश्वानर म्हणजे विश्वातील प्रत्येक चराचर वस्तू/व्यक्तींमध्ये आढळणारे तत्व. उदा. समुद्रात वडवानल, मनुष्याच्या उदरात अग्नि, तेजातील अग्नि तसेच सूर्यातील अग्नि, विस्तव, दीपदंड, दीपक, क्रोध -प्रतिशोधातील अग्नि, तसेच सूर्यातील अग्नि. जातवेद म्हणजे ज्याच्यापासून वेद उत्पन्न झाले आहेत, ती देवता. देवमुख म्हणजे देवतांचे मुख बनून आहुती ग्रहण करणारी देवता.

अध्यात्म दृष्टीने पाहता, अग्नि हे असे तत्व आहे, जे गुरुतत्व, सर्वव्यापक असून पोषण आणि विघात करणारे असते, मनाप्रमाणे!

***रिपुवात्मनः आत्मय मित्रः*** ||

विश्वंभर ही तृतीय देवता आहे, या शब्दाचा असा अर्थ आहे की संपूर्ण विश्वाचे भरणपोषण करणारा, विश्वंभर या शब्दाला 'परमेश्वर' हा उपशब्द देखील आहे. 'विश्वंभर' हे विशेषण विष्णु, कृष्ण, अग्नि आणि पृथ्वी या चारही देवतांना उद्देशून संबोधले जाते, याखेरीज इंद्रालाही असे संबोधले जाते. 'विश्वंभर' हे एका उपनिषदाचेही नाव आहे.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, विश्वंभर या देवतेचे महत्त्व खूप आहे. विश्वंभर या अर्थाने सर्वपोषक व सर्वजनक परमात्मा अथवा प्रकृतीकडे पाहता येईल.

तृतीय देवता ही सूर्य देवता असून मी तिचे स्पष्टीकरण शर्मप्राप्ती सूक्तामध्ये केले आहे, त्याकारणे मी सूर्य अथवा सवितृ या देवतेविषयी स्पष्टीकरण येथे (या) सूक्तात देणार नाही.

चतुर्थ आणि पंचम देवता प्राण आणि अपान आहे. प्राण व अपान हे उभयंता शरीरातील पाच मूलभूत व मुख्य वायुंमधील दोन वायु आहेत. प्राणवायु म्हणजे रक्तात असलेला वायु, जो आपल्याला प्राण व चेतना प्रदान करतो. हा प्राणवायु म्हणजे ऑक्सिजन होय. अपान वायु हा शरीरातील रसांमध्ये असून पायांकडे जाणारा असतो. हे उभयंता वायु आणि अन्य वायु कुंडलिनीद्वारे नियंत्रित व प्रसृत होतात. हे उभयंता वायु अध्यात्मदृष्ट्या महत्त्वाचे असल्याकारणे त्यांचा साधकांवर प्रभाव पडतोच.

हे पाचही वायु पंचमहाभूतांचे प्रतीक आहेत.

षष्ठम देवता ही आयु आहे. आयु ही आयुष्यमान, आर्युमान, आरोग्य आणि आर्युवेदाची देवता असावी. आयु हया देवतेची संरक्षक देवता अर्यमान ही देवता असावी. ज्याप्रमाणे ऋताची संरक्षक देवता वरुण देव आहे. ज्याप्रमाणे ऋत हे एक महत्त्वाचे तत्त्व आहे. ही सृष्टीचे संचालन करते व धर्मास नियंत्रित करते, नीतीची व्यवस्था करते, त्याप्रमाणे आयु हेही महातत्व असावे, ते सृष्टीतील पशु, प्राणी, मनुष्य, देव, गंधर्व, यक्ष व राक्षसांना आयु व आरोग्य प्रदान करणारे तत्व असावे.

हे सूक्त लघुअक्षरी आहे. ह्या सूक्तात पाच ऋचा आहेत. हे सूक्त पुढीलप्रमाणे:-

***प्राणापानौ मृत्येर्मा पातं स्वाहा ॥***

***द्यावापृथिवी उपश्रुत्या मा पातं स्वाहा ॥***

***सूर्य चक्षुषा मा पाहि स्वाहा ॥***

***अग्ने वैश्वानर विश्वैर्मा देवैः पाहि स्वाहा ||***

***विश्वम्भर विश्वेन मा भरसा पाहि स्वाहा ||***

यातील प्रथम मंत्राचा असा अर्थ आहे की हे प्राण व अपान! आपण उभयंता मृत्युपासून आमची सुरक्षा करा आणि आमची आहुती स्वीकार करावी. मृत्यू हे जीवनाचे शाश्वत सत्य आहे, त्याकारणे जन्म घेणाऱ्या कुठल्याही जीवाची यातून मुक्तताही नव्हे. त्याकारणे या मंत्राचा असा अर्थ घेता येईल की हे प्राण अपान! आपण आमचे अपमृत्यू आणि अपघाती मृत्यूपासून रक्षण करा.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे अग्नि आणि धरित्री ! आपण उभयंता जीवन मृत्यूच्या चक्रापासून आमचे रक्षण व मुक्त करा आणि आमची भक्ती,  समर्पण आदि स्वीकार करावे.

तसं पाहता, एका अर्थाने हा मंत्र महामृत्युंजय या मंत्राप्रमाणे अपमृत्युरक्षक मंत्र आहे. (अपमृत्यूपासून रक्षण करणारा)

यातील दुसऱ्या मंत्राचा असा अर्थ आहे की हे दिव म्हणजे स्वर्ग, द्युलोक आणि पृथिवी म्हणजे पृथ्वी, भूलोक! हे दयावा पृथिवी! आपण उभयंता श्रवणाची शक्तीमध्ये उपश्रुती प्रदान करावी, आमची सुरक्षा करावी आणि त्याकरिता असलेली ही आमची आहुती ग्रहण करावी.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे प्रकृती व पुरुष! हे अद्वैत व द्वैता! हे आत्मा व परमात्मा! आपण उभयंता आम्हांला उपश्रुती म्हणजे दुसऱ्या अर्थाने पाहता, वेदाध्ययन करण्याची प्रज्ञा प्रदान करावी. आमच्या प्रज्ञेचे व सदविवेकबुध्दीचे रक्षण करावे.

यातील तिसऱ्या मंत्राचा असा अर्थ आहे की हे सूर्यदेवा! आपण आम्हांला नेत्र शक्ती अथवा दृष्टी शक्ती प्रदान करावी. नेत्र शक्ती म्हणजे पाहण्याची शक्ती प्रदान करावी.  आमची सुरक्षा करावी तसेच आम्ही प्रदान केलेली आहुती ग्रहण करावी.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे तेज महाभूता! आपण आमच्या नेत्रांमध्ये, शरीरामध्ये, मनामध्ये अधिक तेज, शक्ती प्रस्थापित करावी व आमचे रक्षण करावे.

यातील चौथ्या मंत्राचा असा अर्थ आहे की हे वैश्वानर अग्नि देवा! आपण समस्त देवतांसह आमची सुरक्षा करा आणि आमची ही आहुती ग्रहण करा, कारण आपण अन्य देवतांचे सहायक व सरंक्षक देवता आहात.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे विश्वामध्ये सर्वत्र व्याप्त असणाऱ्या व सर्वत्र संचार करणाऱ्या आत्मा व परमात्मा! तुम्ही समस्त तत्त्वासह साधनेचे सरंक्षण आणि आमची साधना तसेच भक्ती स्वीकार करा.

यातील पाचव्या मंत्राचा असा अर्थ आहे की हे समस्त प्राणिमात्र, भूतमात्रांचे पोषण करणारे विश्वंभर! आपण आपली समस्त पोषणशक्तीचे आमचे पोषण तसेच सरंक्षण करावे आणि आमची आहुती स्वीकारावी.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे विश्वाचे संपूर्ण जीवजगताचे व प्रज्ञेचे पोषण करणारी परमप्रकृती! तू आपल्या पोषणशक्तीने आमच्या तन, मन, विचार, बुध्दी, प्रतिभा आणि आत्माचे पोषण कर, तसेच आमच्या भक्ती स्वीकार कर.

# कृष्णाया: पुत्र: अर्जुन:

भौतिक नव्हे, आत्मिक व लौकिक, नव्हे, अलौकिक मंत्र. हा मंत्र अथर्ववेदाच्या १३ व्या कांडातील तिसऱ्या अध्यात्म सूक्तातील २६ वा मंत्र म्हणजे शेवटचा मंत्र आहे. हया मंत्राचा ऋषि यज्ञकर्ता व सृष्टी कर्ता ब्रम्हा असून ह्या मंत्राचा छंद अनुष्टुप आहे. या मंत्राची देवता वरुण पुत्र रोहित, आदित्य आणि अध्यात्म आहे.

प्रथम देवता रोहित ही आहे. रोहित या शब्दाचा अर्थ पाहता, ब्रम्हरुप, सूर्याची प्रथम रश्मी, विष्णु अथवा राजहंस असा होतो. ह्या अर्थाने ही देवता ब्रम्हा, विष्णु या दोन्ही महादेवतांचा अवतार असावी. रोहित ही देवता वरुणाचे अपत्यही मानली जाते. आदित्य गण वरुण ही ऋताची देवता म्हणजेच सृष्टीच्या संचालन तत्त्वांची संरक्षक देवता आहे. रोहित हा वरुण पुत्र म्हणजेच वरुणाला सहाय्यक-सृष्टीच्या संचालनाला सहाय्यक देवता असावी.

द्वितीय देवता आहे आदित्य. आदित्य म्हणजे देवमाता अदितीच्या गर्भातून जन्मलेल्या देवता. किंबहुना सूर्यालाही आदित्य म्हणतात. हिंदू वैदिक धर्मामध्ये ३३कोटी देवता आहेत, त्या ३३ देवतांमधील १२ आदित्यगण आहेत. त्यातील पूषा व अर्यमा या आदित्यगणांचे विस्तृत स्पष्टीकरण मी नारीसुखप्राप्ती सूक्तामध्ये दिलेले आहे, तर अन्य आदित्यांची नावे अशी आहेत – इंद्र, विवस्वान, पर्जन्य, त्वष्टा (विश्वकर्मा) भगादित्य, धाता, मित्र, अंशुमान, वरुण आणि वामन.

तृतीय देवता आहे ती अध्यात्म. अध्यात्म हा मनुष्याचा अंत:करणाचा भाव आहे. कृष्णाने गीतेत अर्जुनाला म्हटले आहे की स्वभाव म्हणजे अध्यात्म आहे, अशी अध्यात्माची व्याख्या केली आहे. अथर्ववेदाच्या ९व्या, ११व्या, १३व्या कांडामध्ये अध्यात्माला देवता म्हटले आहे. अध्यात्म हा भाव आहे. या भावातूनच स्वभावाची अनुभूती आहे, स्वयं बोध आहे. स्वयं बोधाचा अंतिम टोकाला आपल्या आत्मतत्त्व व परमतत्वाची

अनुभूती जुळलेली असते. आत्मबोधाची यात्रा म्हणजे अध्यात्म आहे. म्हणूनच अध्यात्म ही देवता आहे.

***कृष्णाया: पुत्रो अर्जुनो रात्र्या वत्सोजायत |***
***स ह द्यामाधि रोहति रुन्हो रुरोह: रोहित: ||***

या मंत्राचा भौतिक अर्थ असाही होऊ शकतो की कृष्णेचा म्हणजे द्रौपदीचा पुत्र अर्जुन रात्री बाळाच्या रुपाने जन्मला. तो स्वर्गलोकातून धरतीवर चढत आहे आणि त्याला किर्ती, ख्याती आणि उच्च वस्तू प्राप्त आहेत.

मात्र या मंत्राचा खरा अर्थ असा आहे की कृष्णवर्णी रात्रीचा पुत्र सूर्य म्हणजेच अर्जुन उगवत आहे, जो उदित होत असताना आकाशावर चढत आहे. अरुण, उषा, प्रभात व इंद्रधनुष्यावर तो आरोहित होत आहे.

अगोदर जर आपण असा भौतिक अर्थ घेतला, तर द्रौपदीचा पति अर्जुन आहे, तो तिचा पुत्र नव्हे. म्हणूनच आपण या मंत्राचा अर्थ वैदिक पद्धतीने पाहुया.

हा वैदिक अर्थ घेता, हा मंत्र अत्यंत वैज्ञानिक स्वरुपाचा आहे, असे दिसून येते. या मंत्रामध्ये सूर्य उदित होण्याचे विज्ञान सांगितले आहे. याखेरीज 'रात्रीच्या गर्भात उद्याचा उषःकाल' या सार्थक पंक्तीचाही जन्म याच मंत्रातून झालेला असल्याचे कळून येते. याशिवाय आपल्याला हेही कळते, एकाच शब्दाचे अनेक अर्थ असतात आणि विशेषतः वैदिक अर्थ असतात. जसे 'कृष्णा' या शब्दाचे दोन अर्थ आहेत, रात्री, पांडव पत्नी आणि कृष्णाची सखी श्यामलसुंदरी द्रौपदी. 'अर्जुन' या शब्दाचा ही पाच अर्थ होतात, सूर्य, चंद्रमा, पांडुपुत्र अर्जुन, इन्द्र व तेज आदि.

त्याकारणेच हा मंत्र विशिष्ट, रोचक, ज्ञान प्रदायक आणि अतिव सुंदर ठरतो.

## सनातन, सनातनपुरुष, ज्येष्ठ, ब्रम्ह, पूर्णत्व, साधना, साधक, राष्ट्रीयत्व, आत्मा, परमेश्वर, प्रकृती आदिंचे स्पष्टीकरण करणारे महत्त्वाचे दश ब्रम्हमंत्र

हे दश मंत्र म्हणजे सनातन वैदिक हिंदू धर्माच्या अनेक मूल्ये, नीतीतत्त्वे, मान्यता, श्रध्दा आणि मूलतत्त्वाचे बीजे आहेत, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. हे दशमंत्र अर्थववेदातील १०व्या कांडातील ८व्या सूक्तातील निवडक मंत्र आहेत. कारण या सूक्तामध्ये एकूण ४४ मंत्र आहेत. या सूक्ताचा ऋषि अर्जुन नामक ब्राह्मण योध्दाचा पुत्र कुत्स अथवा चाक्षुष नामक मनुपुत्र कुत्स आहे. ह्या सूक्ताची देवता अध्यात्म आहे. या सूक्तातील प्रत्येक मंत्राचा मुख्य छंद त्रिष्टुप असून मी निवडलेल्या मंत्राचा छंद भुरिक बृहती, अनुष्टुप, भुरिक त्रिष्टुप असे आहेत. ह्या सूक्ताचे काही निवडक मंत्रही श्वेताश्वतरोपनिषदामध्येही आढळतात.

या सूक्ताचे नाव ‘ज्येष्ठब्रम्ह सूक्त’ आहे. ज्येष्ठ ब्रम्ह –‘ज्येष्ठ’ या शब्दाचा प्रचलित अर्थ ‘वयाने ज्येष्ठ ' असा आहे, मात्र याचा येथे अर्थ असा आहे की ‘गुणांमध्ये श्रेष्ठ’. ज्येष्ठ ब्रम्हाच्या विषयी विचारवंतांच्या दोन अवधारणा पाहायला मिळतात. एक मान्यता अशी आहे की ज्येष्ठामध्ये सर्वात ज्येष्ठ ब्रम्ह असलेले ज्येष्ठ ब्रम्ह आहे. अन्य त्यांच्यापासून कनिष्ठ अशी ब्रम्हे आहेत. उदा. अपरब्रम्ह, परब्रम्ह, सुब्रम्ह, महाब्रम्ह. दुसरी मान्यता वेदांतील अपरब्रम्ह व परब्रम्ह सारखी आहेत. ब्रम्ह हे संबोधन अनेक स्थानी उपायुक्त केले जाते, “ब्रम्हविद्या ब्रम्हकुमार, ब्राम्हण, ब्रम्हहत्या, अयामात्मा ब्रम्ह, अहं, ब्रम्हासि, ब्रम्हकर्म (यज्ञ) ब्रम्हज्ञान (वेद) ब्रम्हवर्चस, अपो वे ब्रम्ह इत्यादी. अपर ब्रम्ह हे तर सृष्टीचा उद्भव, पालन व संवरणकर्ता आहे. मात्र जो परमव्योमामध्ये ज्याक्षणी सृष्टी नसतांही अस्तित्त्वात होता, त्यालाच परम वा ज्येष्ठ ब्रम्ह म्हटले जाते. (परब्रम्ह)

हे निवडक मंत्र पुढीलप्रमाणे:-

***दूरे पूर्णेन वसति दूर अनेन हीयते |***

***महद् यक्षं भुवनस्य मध्ये तस्मै बलिं राष्ट्रभृतो भरन्ति ||१५||***

सहस्त्राहण्यं वियतावस्य पक्षौ हरेहॅंसस्य पततः स्वर्गम् |
स देवान्सर्वानुरस्युपदध सपश्यन् याति भुवनानि विश्वा
||१८||

सनातन मेनमाहुरुतादय स्यात्. पुनर्णवः |
अहोरात्रे प्र जायेते अन्यो अन्यस्य रुपयोः ||२३||

शतं सहस्त्रमयुतं न्यर्बुदमसंख्येयं स्वमस्मिन् निविष्टम् |
तदस्य घ्नन्त्यभिपश्यत एव तस्माद् देवो रोचत एष एतत्
||२४||

त्वं स्त्री त्वं पुमानसि त्वं कुमार उत वा कुमारी |
त्वं जीर्णो दण्डेन वञ्चसि त्वं जातो भवसि विश्वतोमुखः
||२७||

पूर्णात् पुर्णमुदचति पूर्ण पूर्णेन सिच्यते |

*उतो तद्दय विद्याम् यतस्तत् परिषिच्यते ||२९||*
*एषा सनत्नी सनमेव जातैषा पुराणी परि सर्व बभूव |*
*मही देव्युइवसो विभाति सैकेनैकेन मिषता वि चष्टे ||३०||*

*उत्तरेणेव गायत्रीममृतेधि वि चक्रमे |*
*साम्ना ये साम संविदुरजस्तद् ददृशे क्व ||४१||*

*पुण्डरीकं नवद्वारं त्रिभिर्गुणेभिरावृत्तम् |*
*तस्मिन् यद् यक्षमात्मन्वत् तद् वौ ब्रम्हवृन्दो विदुः ||४३||*

*अकामो धीरो अमृतः स्वयंभू रसेन तृप्तो न कृतश्चनोनः |*
*तमेव विद्वान न बिभाय मृत्योरात्मान धीरमजरं युवानम्*
*||४४||*

यातील प्रथम मंत्र हा ज्येष्ठ ब्रम्हसूक्त म्हणजेच या सूक्तातील १५ वा मंत्र आहे. या मंत्राचा असा अर्थ आहे की अपूर्णत्व आणि

पूर्णत्व या दोन्हीच्याही पलीकडे हे पूजनीय परब्रम्ह म्हणजे पूजनीय परमात्मा व परमप्रकृती महान विश्व-ब्रम्हांडाच्या मध्यामध्येही स्थित त्या विराटासाठी राष्ट्र सेवक म्हणजे राष्ट्रभक्त आपले बलिदान देतात, आपली भक्ती व समर्पणही प्रदान करतात.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, परमात्मा अथवा परमप्रकृती मोक्षप्राप्तीकरिता, विराट पुरुषाकरिता भक्ती, समर्पण, साधना, पंचप्राण, नवद्वारे, पंचेद्रिये, नऊ गति व त्रिगुण हे सर्व मानसिक व आत्मिक घटक पूर्णत्वाला भजणारे भक्तच अर्पण करतात.

यातील द्वितीय मंत्र हा ज्येष्ठ ब्रम्हसूक्तातील १८ वा मंत्र आहे. या मंत्राचा असा अर्थ आहे की सहस्त्र दिनांच्या प्रयासानंतर या हंसाचे जीर्ण पंख गळून पडतात, तत्क्षणीच हा हंस मुक्त स्वरुपात स्थित होतो. तो समस्त देवतांना हदयामध्ये धारण करुन समस्त धामांचे दर्शन घेत नव्या पखांनी उडत जातो.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, सहस्त्र दिनांच्या साधना व तपस्येनंतर त्रिगुणांनी बध्द असलेल्या जीवात्माचे आवागमन बंध

म्हणजेच जन्म व मृत्यूची चक्रे तुटतात. तो जीवात्मा मुक्ती अवस्था प्राप्त करतो. तो मुक्तात्मा समस्त दिव्यतांना हदयामध्ये धारण करुन, सर्व धामांचे म्हणजेच चक्रांचे दर्शन घेत परमधामाला म्हणजे सहस्त्रार चक्राला प्राप्त होतो.

यातील तृतीय मंत्र अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण यामध्ये सनातन पुरुषाचा उल्लेख आला आहे. आणि आपल्या धर्माचेसुध्दा नाम 'सनातन' आहे . सनातन म्हणजेच परंपरेने व वंशानुवंशे चालत आलेला, सदैव चालत राहणारा, शाश्वत, नित्य, अनादि व अनंत. ह्या सनातनाचे आधार सनातनपुरुष म्हणजेच ज्येष्ठब्रम्ह आणि सनातन शक्ती म्हणजे ऋत आहेत. हा मंत्र या सूक्तातील २३ वा आहे. या मंत्राचा असा अर्थ आहे की (जो यज्ञाद्वारे भोजन ग्रहण करणाला व प्रदान करणारा आहे व जो सर्वोत्कृष्ट स्थानांवर स्थित आहे, जो विभिन्न रुपात सृष्टीचे निर्माण, संचालन, पालन, व्यवस्थापन व नश्यन करतो.) त्यालाच सनातन (पुरुष) म्हणतात. तो पुरातन असूनही नूतन आहे, ज्याप्रमाणे दिन-रात्री अन्योन्याश्रित रुपाने एकमेकांवर निर्भर असून सदैव उत्पन्न होत असूनही सनातन आहेत.

हा मंत्र स्वयं आध्यात्मिक असून याकरिता मी वेगळे स्पष्टीकरण देत नाही. कारण सनातन पुरुष म्हणजे परमात्मा असून सनातन शक्ती म्हणजे परमप्रकृती आहे.

यातील चतुर्थ मंत्र या ज्येष्ठ ब्रम्हसूक्तातील २४वा मंत्र आहे. या मंत्राचा असा अर्थ आहे की ज्याप्रमाणे एक केश न दिसण्याइतका सूक्ष्म असतो, त्याप्रमाणे असलेली जड आणि चेतन तत्त्वे (आत्मा आणि मन, विचार, स्पंदन आदि ) ही सहस्त्रच नव्हे तर असंख्य असतात. ही सर्व सत्वे (तत्त्वे) हयामध्ये म्हणजे चैतन्य आद्यशक्ती अथवा ज्येष्ठ ब्रम्हामध्येच संमाहित असतात आणि ते सर्व त्यातून उत्पन्न होतात व त्यातच लीन होतात. हा देव म्हणजेच ज्येष्ठ ब्रम्हच सर्वांमध्ये साक्षीरुपाने प्रकाशित होत राहतो, निवास करत राहतो.

हाही मंत्र आध्यात्मिक असल्याकारणाने मी याचेही स्पष्टीकरण देत नाही.

यातील पंचम मंत्र हा ज्येष्ठ ब्रम्हसूक्तातील २७ वा मंत्र आहे. हा मंत्र श्वेतोपदोपनिषदामध्ये आढळतो. या मंत्राचा असा अर्थ आहे की, हे सनातना! तूच स्त्री आहेस, तूच पुरुष आहेस, तूच युवक आणि तूच युवती आहेस. तूच वृध्द होतोस आणि तूच वृध्द होऊन हातामध्ये काठी घेऊन चालतोस, अर्थातच तूच नाना रुपांमध्ये प्रकट होतोस.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, हे सनातना! तूच आदिशक्ती आहेस, तूच पुरुष आहेस, तूच परमप्रकृती आहेस, तूच परमात्मा आहेस, तूच ऋतावरी आहेस, तूच बालदित्य आहेस. तूच ज्येष्ठब्रम्ह आहेस. तूच ज्येष्ठब्रम्ह होऊन हातात न्यायाचा दंड धारण करतो आहेस, अर्थातच तू एकच असून तुझी अनेक रुपे आहेत.

यातील षष्ठम मंत्र हा या सूक्तातील २९ वा मंत्र आहे. ह्या मंत्रासारखा असलेला अन्यही मंत्र ईश उपनिषदामध्ये आढळतो. तो मंत्र असा आहे – पूर्णात् पूर्णम् इदम् पूरणात्पूर्णमुदच्युते| पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवापशिष्यते || ह्या मंत्राचा उपयोग कार्य पूर्तीवेळी

केला जातो. हा मंत्र ब्रम्ह व परब्रम्हाच्या सामर्थ्याचे वर्णन करणारा आहे.

आता आपण ज्येष्ठ ब्रम्हसूक्तातील २९ व्या मंत्राचा अर्थ पाहुया. या मंत्राचा असा अर्थ आहे की पूर्णातून पूर्ण उत्पन्न होते. पूर्णातूनच पूर्णाचा नाश होतो. आता याचा बोध झाल्यानंतर आपण हे जाणू शकतो की पूर्ण हे कशातून उत्पन्न होते व नष्ट होते. ( म्हणजेच पूर्ण हेच त्रिकाल-अबाधित असते.)

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, परब्रम्हाच्यातूनच (परमेश्वर) परब्रम्ह म्हणजे जगतही निर्माण होते, परब्रम्हानेच परब्रम्हाच्या म्हणजेच जगताचा नाश होतो. हयाचा बोध फक्त ब्रम्हविद् वा ब्रम्हज्ञानींना होतो. कारण ही ब्रम्हलीला बुध्दी, कल्पना, प्रतिमा व विचाराच्याही पलीकडची आहे.

यातील सप्तम मंत्र अत्यंत सुंदर मात्र महत्त्वपूर्ण आहे. कारण या मंत्रामध्ये सनातन शक्तीचा उल्लेख आहे. सनातन शक्ती, जी

सनातन धर्माच्या मूलाधार व कुंडलिनी असून जी पुरातनी असूनही नवीन आहे.

हा मंत्र या सूक्तातील ३० वा मंत्र आहे. या मंत्राचा अर्थ पाहिल्यास ही सनातनी शक्ती म्हणजे सन्तनी (सनातन हा शब्द सनत् अथवा सत् या शब्दापासून उत्पन्न झाला आहे. सत् म्हणजे उत्तम, श्रेष्ठ,सत्य, ब्रम्ह, वेद, नित्य, विद्वान, दृढ व शुद्ध) तर ही सनातनी शक्ती सनातन कालापासून म्हणजे चिरकालापासून विद्यमान आहे. ही पुरातन शक्तीच समस्त ब्रम्हांडामध्ये व्याप्त राहिलेली आहे. ही महान देवीच उषेला आभामयी, तर रात्रीला अंधकारमय करते म्हणजेच ही सनातनी देवी सृष्टीचे संचालन करते. तिचे प्रत्येक प्राणी व त्याच्या कर्मावर लक्ष असते. एका अर्थाने ती कर्म फलदात्री आहे.

हाही मंत्र अध्यात्मिक असल्याकारणे मी वेगळे स्पष्टीकरण दिलेले नाही.

यातील अष्टम मंत्र हा ज्येष्ठ ब्रम्हातील ४१वा मंत्र आहे. या मंत्राचा असा अर्थ आहे की जो साधक प्राणांकडून उत्तरेमध्ये

स्थित अमृत प्रवाहाला प्राप्त करत गायत्री महाविद्यांमध्ये गतिशील राहतो.( कारण गायत्री मंत्र हाच विद्या, पराविद्या, अपराविद्या व महाविद्याचे मूलतत्वबीज आहे. जो साम म्हणजे आत्मतत्त्वानेच हा साम म्हणजेच परमात्मात्वाला जाणतात, तेच हे जाणू शकतात की अजन्मा व अनंत असलेल्या परमात्म्याचा प्रत्यक्ष साक्षात्कार करता येईल.

हाही मंत्र अध्यात्मिक आहे, म्हणून मी स्पष्टीकरण देत नाही.

यातील नवम मंत्र हा ज्येष्ठ ब्रम्हसूक्तातील ४३ वा मंत्र आहे. या मंत्राचा असा अर्थ आहे की हे नव द्वाराचे म्हणजे नवदलाचे असलेले पुंडलिक ( पांढऱ्या वर्णाचे कमल ) तीन गुणांनी म्हणजेच पर्णानी घेरलेले आहे. त्याच्यामध्ये जे वंदनीय स्थान आहे, मध्यात्माचे त्याला पंडितच जाणतात.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, नवद्वाराने परिपूर्ण असलेले म्हणजे नऊ गती व द्वारांनी युक्त असलेले शरीराचे जीवनरूपी कमल त्रिगुणांनी म्हणजेच सत्, रज, तम् यांनी घेरलेले आहे.

त्याच्यामध्ये जे आत्म्याचे वंदनीय स्थान आहे, त्याला ब्रम्हज्ञानीच जाणतात.

यातील दशम मंत्र हा ज्येष्ठ ब्रम्हसूत्रातील शेवटचा मंत्र आहे. या मंत्राचा असा अर्थ आहे की निष्काम, धैर्यवान, अमर तसेच स्वयंभू ब्रम्ह म्हणजेच आदिशक्ती, आदितत्त्व अथवा ज्येष्ठब्रम्ह स्वतःच्याच रसाने तृप्त राहतो. तो कुठलाही स्थानात, काळात न्यून भावात नव्हे, त्या धैर्यवान, अमर व नित्य युवान म्हणजेच अनादिअनंत आत्मा आणि परमात्माला जाणणारे विद्वान कधीच मृत्यूचे भय बाळगत नाहीत.

हा मंत्र अतिशय सुंदर व ज्ञानदायी आणि परिपूर्ण तसेच सनातन धर्माचे मुलाधार असणाऱ्या संकल्पना स्पष्ट करणारे आहेत. प्रत्येकाने जाणून घ्यावे, त्या मंत्राचे ज्ञान घ्यावे असे मंत्र आहेत.

# ब्रम्हगवी सूक्त (पाचवे)

हे सूक्त अथर्ववेदाच्या बाराव्या कांडातील पाचवे सूक्त आहे. या सूत्राचे ऋषी अथर्वचार्य आहेत. या सूक्ताची देवता ब्रम्हगवी आहे. ब्रम्हगवी म्हणजे ब्राम्हणांची गाय. ब्राम्हणांची गाय म्हणजे साक्षात कामधेनु असते. कारण ब्राम्हणच गाईचे उत्तम चिंता वाहू शकतो व तिला अनेक सिद्धींनी परिपूर्ण करू शकतो. याशिवाय वैदिक भारतात म्हणजेच आर्यवर्तात गायीच्या संख्येवरून व त्यांच्या पालनावरून कुटुंबाची प्रतिष्ठा ठरायची. याखेरीज जे गोपाल उच्च कुलातील असायचे, त्यांना 'सुगोप' 'ब्राम्हण' म्हटले जायचे.

दृष्टीने पाहता ब्राम्हणांची कामधेनु हे त्याच्या तपशक्तीची आणि वाक् शक्तीचे प्रतीक म्हटले जाते.

या सूक्तात एकूण सहा मंत्र आहेत. या सूक्ताचे छंद प्राजापत्य अनुष्टुप, भूरिक साम्नी अनुष्टुप, चतुष्पदा स्वराट, उष्णिक

आसूर्यनष्टुप, साम्नी पंक्ति, साम्नी उष्णिक हे आहेत. हे सूक्त अल्पाक्षरी आहेत.

हे सूक्त पुढीलप्रमाणे आहे:-

*श्रमेन तपसा सृष्टा ब्रम्हणा वित्तते श्रिता* ||

*सत्येनावृता श्रिया प्रावृत्ता यशसा परीवृता* ||

*स्वधया परिहिता श्रध्दया पर्यूढा दीक्षया गुप्ता*

*यज्ञे प्रतिष्ठिता लोको निधनम्* ||

*ब्रम्ह पदवायं ब्राम्हणोधिपति:* ||

*तामाददानस्व ब्रम्हमवीं जिनतो ब्राम्हण क्षत्रियस्य*||

*अप क्रामाति सूनृता वीर्य पुण्या लक्ष्मी:* ||

यातील प्रथम मंत्राचा असा अर्थ आहे की तपश्चर्या व श्रमाने उत्पन्न वा अर्जित केली गेलेली व सत्यामध्ये आश्रय घेणारी ही ब्रम्हगवी ब्राम्हणाद्वारे जाणली वा ओळखली जाते.

अध्यात्म दृष्टीने पाहता, तपश्चर्या, साधना, शुद्ध समर्पण भाव व सत्कर्माकारणे अर्जित केली जाणारी आणि सत्यामध्ये निवास करणारी ही ब्रम्हविद्या ब्रम्ह अथवा परब्रम्हाद्वारे उत्पन्न केली जाते व विख्यातही होते.

यातील द्वितीय मंत्राचा असा अर्थ आहे की ही सत्याने आच्छादित, श्री-संपदेने परिपूर्ण आणि यशस्वितेने चारही बाजूंनी अथवा दिशांनी संपन्न राहणारी आहे, ही ब्रम्हगवी आहे.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता ही ब्रम्हविद्या आहे, जी सत्याने आवृत्त व परिपूर्णतेने भृत आहे, स्वयं यशस्विनी आहे.

यातील तृतीय मंत्राचा असा अर्थ आहे की ही ब्रम्हगवी आपल्या धारणा शक्तीने सुरक्षित झालेली असून, श्रध्दा भावनेने संपन्न व दीक्षाव्रताने सरंक्षित असून यज्ञामध्ये प्रतिष्ठित राहते. ब्राम्हणेतरांनी म्हणजे क्षत्रिय, वैश्य अथवा शूद्रांनी ह्या गवीचे (गाईचे) हरण करण्याची इच्छा ठेवणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण

करण्याप्रमाणे आहे. कारण गोग्रहण हा धर्म असून गोहरण हा अधर्म आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहता, ही ब्रम्हविद्या परमप्रकृतिद्वारे सुरक्षित साधनेने संपन्न व व्रताने परिपूर्ण असून यज्ञ, दान, सत्कर्म, पुण्य, साधना व ध्यान अशा धर्म -कर्मांमध्ये प्रतिष्ठित राहते. साधकेतर म्हणजे मांत्रिक, यक्ष, पिशाच्च व ब्रम्हराक्षसांनी ह्या विद्येचा अपहार करण्याचा विचार करणे म्हणजेच स्वतःचाच नाश करुन घेणे.

यातील चतुर्थ मंत्राचा असा अर्थ आहे की या ब्रम्हगवी द्वारे ब्रम्हपदाची प्राप्ती होते, म्हणून या ब्रम्हगवीचा स्वामी अथवा अधिपती ब्राम्हणच आहे.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, ब्रम्हविद्येद्वारे ब्रम्हपद म्हणजे सायुज्य मुक्ती, मोक्षाची प्राप्ती होते, म्हणूनच या ब्रम्हविद्येचा स्वामी व जनक परब्रम्ह अथवा ज्येष्ठ ब्रम्हच आहे.

यातील पंचम व षष्ठम मंत्राचा असा अर्थ आहे की ब्रम्हगवी म्हणजे ब्रम्ह. ब्राम्हणांच्या अथवा कुणाच्याही गायींच्या अपहरणकर्ता असलेल्या आणि ब्राम्हणांना, विद्वानांना व ब्रम्हज्ञानींना व्यथा, दुःख, पीडा देणाऱ्या ब्राम्हणेतरांची म्हणजे क्षत्रिय, वैश्य व शूद्राची लक्ष्मी, वीर्य, पुण्य, प्रियजण व वाणी त्यांचा त्याग करतात.

आध्यात्मिक दृष्टीने पाहता, ब्रम्हविद्या म्हणजे साधक व ब्रम्हज्ञानींच्या विद्या व साधनेचा अपहार करु पाहणाऱ्या आणि साधक, पूजक, भक्त, पुरोहित, यज्ञ करणाऱ्यांना पीडा देणाऱ्या, त्यांच्यावर मंत्रप्रयोग करणाऱ्या साधकेतर म्हणजे मांत्रिक, यक्ष, पिशाच्च व ब्रम्हराक्षसांची विद्या, शक्ती, मंत्र सामर्थ्य व वाणी नष्ट होते

## *परिशिष्ट*

१) अभिचार:- अनुष्ठान,सहसंबंध

२) कांड:- अध्याय,सर्ग

३) शोधन:- शोधणे वा प्राप्त करणे

४) प्रारण:- थैली

५) संपोषक:- पोषक

६) परमेष्ठि:- देवतासमान मनुष्य

७) उपश्रुती:- श्रवणाची सीमा

८) ऋत:- त्रिकालाबाधित सत्य

९) आवागमन:- आगमन – गमन

१०) नश्यन:- नाश.

११) ब्रम्हविद्:- ब्रम्हविद्येचे ज्ञाते

१२) ब्राम्हणेतर:- ब्राम्हणाशिवाय इतर वर्ण

१३) साधकेतर:- साधकांशिवाय तांत्रिक, मांत्रिक

१४) दस्यु:- अनार्य,असंस्कृत

१५) उत्थान:- प्रगती

१६) पंचगव्य:- दुग्ध,दही, घृत, शेण, गोमूत्र असे गायीपासून प्राप्त होणारे पदार्थ.

# संदर्भ ग्रंथांची सूची


१)हिंदू तत्त्वज्ञान

२) ऋग्वेद

३) यजुर्वेद

४) अथर्ववेद

५) ब्राम्हण पुराण

६) ऐतरेय ब्राम्हण उपनिषद

७) महाभारत

८) द्रौपदी

९) भगवद्गीता

१०) देवी पुराण

११) देवी माहात्म्य

१२) शांकरभाष्य

१३) अथर्ववेद प्रथम काण्ड भाष्यासहित

१४) अथर्ववेद संहिता ( हिंदी):- श्रीराम शर्मा

१५) विकिपीडिया

१६) विविध संकेतस्थळे

*हे पुस्तक कसे वाटले, हे*

*shaktileelanikita@gmail. com*


*या माझ्या इमेल आयडीवर रिप्लाय देऊन कळवा.*


*९९९९९*


## निकिता पाटील यांची ई साहित्यवर प्रकाशित पुस्तके


पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर

क्लिक करा








# निकिता पाटील यांची ई साहित्यवर प्रकाशित पुस्तके















## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष.

## निकिता पाटील यांचं ई साहित्यवरचं हे पंधरावं पुस्तक.

निकिता राजेश पाटील ही विद्यार्थिनी मूळची डोंबिवलीची असून सद्यकालात तिचे वास्तव्य काही वर्षांपासून वांगणीत आहे. कुटुंबात लेखनाचा वा साहित्याचा वारसा असा नाही. पण अगदी शालेय वयातच तिला लेखनाची ऊर्मी शांत बसू देईना. वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत तिने पूर्ण पुस्तक होईल इतके लिहिले. नंतर मराठी साहित्याचा रितसर अभ्यास करून आता ती साहित्याच्या वेगवेगळया रसांच्या निर्मितीचा अनुभव घेत आहे. तिने लिहिलेल्या यापुर्वीच्या पुस्तकांचे कौतुक जाणकार वाचकांनी केले आहे.

अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. पण त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकविक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आली नाही तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता इंटरनेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत नेण्याचे काम अनेक संस्था करत आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ६ लाख वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी ई साहित्यचे प्रयत्न चालू आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे,

यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, कुमार सोनावणे, प्रतिक उकले, सुजाता सिद्धा, गायत्री रोडे, मनोज कळमकर, काजल दळवी, सचिन बोरसे, कार्तिकी भट, डॉ. प्रितम दरवडे, अमोल गवळी, निकिता पाटील, संजीवनी देशपांडे, अंकिता शिंदे, काजल दळवी, दिपूजा चव्हाण असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?